संत श्री आशारामजी आश्रमाद्वारे प्रकाशित

# ऋषी प्रसाद

मराठी

मूल्य : ₹ ६
प्रकाशन दिनांक :
१ सप्टेंबर २०१३
वर्ष : १७ अंक : ३
(निरंतर अंक : २४९)



इ.स. २००४ मध्ये शंकराचार्य श्री जयेंद्र सरस्वती यांना अटक करून 'ते दोषी आहेत' असा घृणित प्रचार करण्यात आला होता. जेव्हा जेव्हा लोक-मांगल्यात रत आपला संत-समाज व संस्कृतीवर अशा प्रकारचे आक्रमण झाले, तेव्हा तेव्हा पूज्य बापूजींनी संस्कृती-रक्षणार्थ आवाज उठविला आहे. आता जेव्हा पूज्य बापूजींना षड्यंत्र करून अटक करण्यात आली, तेव्हा करोडोंच्या संख्येत देशाची जनता व संत-समाज रस्त्यावर उतरले आहेत.




संत-संमेलन, सुरत




जंतर-मंतर, दिल्ली



षड्यंत्र करून पूज्य बापूजींना केलेल्या अटकेच्या विरोधात दिल्लीत एकत्र झालेला लाखोंचा जनसमुदाय

## असे का ?

| | | |
|---|---|---|
| मुलीच्या तक्रारीच्या आधारावर नोंदविलेल्या पोलीस एफआयआर मध्ये बलात्काराचा आरोप नाही | → | मग का लावण्यात आले बलात्काराचे गैर जामीन कलम ? |
| मुलीचा मेडिकल तपासणी रिपोर्ट - सामान्य | → | तर मग का करण्यात आला मीडियाद्वारे असा दुष्प्रचार की बलात्काराची पुष्टी झाली आहे ? |
| मुलगी उत्तर प्रदेशची, शिकत होती मध्य प्रदेशात, तथाकथित घटना जोधपूर (राज.) ची सांगत आहे | → | मग एफआयआर ५ दिवसांनी दिल्लीच्या कमला मार्केट ठाण्यात रात्री २.४५ वाजता का नोंदविण्यात आली ? |
| "आम्हाला कोणतीही सीडी किंवा व्हिडिओ क्लिप मिळाली नाही. या तथ्यहीन गोष्टी आहेत." - पोलीस उपायुक्त अजय पाल लांबा | → | तर मग का करण्यात आला अश्लील सीडी मिळाल्याचा खोटा दुष्प्रचार ? |
| तांत्रिक विधी करण्याचे व अन्य आरोप, ज्यांना सर्वोच्च न्यायालयाने खारिज केले होते | → | मग त्यांनाच काही मीडियावाले तिखट-मीठ लावून पुन्हा का प्रसारित करीत आहेत ? |

**काय आत्ताही या षड्यंत्राचे पितळ उघडे पडण्यात काही शिल्लक आहे ?**



घेरावबंदीने ग्रस्त हिंदूंनो ! खोटे आरोप व कुप्रचार करून तुमचे मार्गदर्शक व संत योजनाबद्ध रितीने संपविले जातील. जोपर्यंत तुम्हाला ही गोष्ट कळून चुकेल, तोपर्यंत खूप उशीर झालेला असेल. म्हणून सावधान ! - प्रसिद्ध कायदेपंडित श्री सुब्रह्मण्यम स्वामी

पूज्य बापूजींवर होत असलेल्या अन्यायाच्या विरोधात संपूर्ण देशात लाखो लोकांनी शेकडो मोर्चे काढले, धरणे प्रदर्शन केले, तरीही अधिकांश मीडियाने हे सत्य समाजापासून लपविले आणि काही जणांच्या विरोध प्रदर्शनाला तिखट-मीठ लावून दाखविले.




जागेअभावी आम्ही सर्वच छायाचित्रे देऊ शकलो नाहीत. अन्य अनेक छायाचित्रांसाठी पहा : www.ashram.org

# ऋषी प्रसाद

मासिक

मराठी, हिंदी, गुजराती, ओडिआ, कन्नड, इंग्रजी, तेलुगू, सिंधी, सिंधी (देवनागरी) व बंगाली भाषेत प्रकाशित

वर्ष : १७ अंक : ३
भाषा : मराठी (निरंतर अंक : २४९)
प्रकाशन दिनांक : १ सप्टेंबर २०१३ मूल्य : ₹ ६
श्रावण-भाद्रपद शके १९३५

स्वामी : संत श्री आशारामजी आश्रम
प्रकाशक और मुद्रक : श्री कौशिकभाई पो. वाणी
प्रकाशन स्थल : संत श्री आशारामजी आश्रम, मोटेरा, संत श्री आशारामजी बापू आश्रम मार्ग, साबरमती, अहमदाबाद -३८०००५ (गुजरात)
मुद्रण स्थल : हरि ॐ मैन्युफेक्चरर्स, कुंजा मतरालियों, पौंटा साहिब, जि. सिरमौर (हि.प्र.) - १७३०२५
संपादक : श्री कौशिकभाई पो. वाणी
सहसंपादक : डॉ. प्रे.खो. मकवाणा, श्रीनिवास
संरक्षक : श्री जमनालाल हलाटवाला


**सभासद वर्गणी** (टपाल खर्चासह)

भारतात

| कालावधी | मराठी व अन्य भाषा | इंग्रजी भाषा |
|---|---|---|
| वार्षिक | रु. ६०/- | रु. ७०/- |
| द्विवार्षिक | रु. १००/- | रु. १३५/- |
| पंचवार्षिक | रु. २२५/- | रु. ३२५/- |
| आजीवन | रु. ५००/- | ---- |

विदेशांमध्ये (सर्वच भाषा)

| कालावधी | सार्क देश | इतर देश |
|---|---|---|
| वार्षिक | रु. ३००/- | US $ 20 |
| द्विवार्षिक | रु. ६००/- | US $ 40 |
| पंचवार्षिक | रु. १५००/- | US $ 80 |

कृपया आपली सभासद वर्गणी वा इतर कोणत्याही प्रकारची रोख रक्कम रजिस्टर्ड वा साधारण पोस्टाने पाठवू नये. अशा प्रकारे पाठविलेली कोणतीही रक्कम गहाळ झाल्यास आश्रमाची जबाबदारी राहणार नाही. म्हणून आपली रक्कम मनिऑर्डर किंवा डिमांड ड्राफ्टनेच ('ऋषी प्रसाद'च्या नावे अहमदाबाद मध्ये देय) पाठविण्याची कृपा करावी.


पत्रव्यवहाराचा पत्ता : 'ऋषी प्रसाद', संत श्री आशारामजी आश्रम, संत श्री आशारामजी बापू आश्रम मार्ग, साबरमती, अहमदाबाद-३८०००५ (गुजरात).
फोन : (०७९) २७५०५०१०-११, ३९८७७७८८.
फक्त 'ऋषी प्रसाद'च्या चौकशीसाठी : (०७९) ३९८७७७४२
e-mail: ashramindia@ashram.org
web-site: www.ashram.org, www.rishiprasad.org


## • अनुक्रमणिका •


(१) षड्यंत्राविरुद्ध संत-समाजाचा शंखनाद ४
(२) ते म्हणतात... ५
(३) अन्यायाविरुद्ध आवाज बुलंद करण्यासाठी रस्त्यांवर उतरल्या विविध संघटना ६
(४) पूज्य बापूजींना बदनाम करण्याचे सुनियोजित षड्यंत्र ७
(५) तत्त्व दर्शन ११
✻ ध्रुव आणि भगवान विष्णूंचा रहस्यमय वार्तालाप
(६) सद्गुरु महिमा १२
✻ शिष्य नव्हे,सरळ गुरुच बनविले !
(७) जीवन पाथेय १४
✻ ती अधीनता जिच्यामुळे परम स्वाधीनता !
(८) आत्ता केले नाही तर केव्हा कराल ? १५
(९) पर्व मांगल्य १६
✻ इंद्रियांवर विजय मिळविण्याचे पर्व : विजयादशमी
(१०) संयम आणि ब्रह्मचर्य १८
✻ भारतीय मनोविज्ञान किती यथार्थ !
(११) उपासना अमृत १९
✻ सुख, शांती व पुण्य वर्धक : श्राद्ध
(१२) भगवान श्रीकृष्णांचे ६४ दिव्य गुण २१
(१३) शास्त्र दोहन २२
✻ इष्टनिष्ठा, दृढता व आत्मविश्रांतीने सफलता
(१४) ज्ञान गंगोत्री २३
✻ दुःखाला उत्सव बनविण्याची कला
(१५) चिंतनधारा २४
✻ बापरे बाप ! कशी दुःखदायी आहे ममता !
(१६) घर-परिवार २५
✻ कौटुंबिक भांडणतंट्यांना प्रेमात कसे बदलावे ?
(१७) ओळखा पाहू २६
(१८) 'संत सताये तीनों जायें, तेज बल और वंश' ३०
(१९) पर्व मांगल्य ३१
✻ ते क्षण आत्मसाक्षात्काराचे...
(२०) शरीर स्वास्थ्य ३३
✻ आरोग्य व पर्यावरण रक्षणाचा अमोघ उपाय : गायीचे तूप
(२१) संस्था समाचार ३४



**विविध टी.व्ही. चॅनल्सवर पूज्य बापूजींचा सत्संग-कार्यक्रम**

A2Z NEWS – दररोज सकाळी ३, ५-३० व ७-३०, रात्री १० व दुपारी २-४० वाजता (केवळ मंगळ, गुरु, शनि.)
हरि ॐ TV – २४ तास (धुळे जिल्हा)
Care WORLD – दररोज सकाळी ७-०० वाजता
आस्था AASTHA THE FAITH CHANNEL – ९-४० वाजता
आस्था भजन – दररोज रात्री ९-२० वाजता
सत्य – दुपारी २ वाजता
मंगलमय चॅनल – www.ashram.org वर

❖ A2Z चॅनल 'बिग टी.व्ही.' (चॅनल नं. ४२५) वर उपलब्ध आहे. ❖ आस्था चॅनल डिश टी.व्ही. (चॅनल नं. ७६१), टाटा स्काय (चॅनल नं. १८०), व्हिडिओकॉन (चॅनल नं. ६७७), डीडी डायरेक्ट+ (चॅनल नं. ३०) व 'बिग टी.व्ही.' (चॅनल नं. ६५०) वर उपलब्ध आहे.
❖ 'मंगलमय चॅनल' इंटरनेटवर www.ashram.org/live लिंकवर उपलब्ध आहे.

Opinions expressed in this magazine are not necessarily of the editorial board. Subject to Ahmedabad Jurisdiction.

# षड्यंत्राविरुद्ध संत-समाजाचा शंखनाद



''मी आज पूर्णतः विकलेल्या काही लोकांना प्रश्न विचारू इच्छितो की जेव्हा घटना आपल्याला सांगते की जोपर्यंत दोष सिद्ध होत नाही तोपर्यंत त्या माणसाला दोषी मानले जात नाही, तर तुम्ही आमच्या संत आशारामजी बापूंना दोषी कसे काय म्हटले ? ही भारताच्या घटनेची अवमानना आहे. ६ कोटी अनुयायांच्या काळजात तलवार खुपसणे, काय ही भारताच्या घटनेची हत्या नाही ? जगद्गुरू जयेंद्र सरस्वतींवरही तुम्ही आरोप लावला, सर्वोच्च न्यायालयात ते निर्दोष सिद्ध झाले. हे का नाही दाखविले मीडियाने ? आजपर्यंत तुम्ही माफी का नाही मागितली ? आपल्या संत-समाजाचा खूप मोठा संघ आहे. हे 'शांती-शांती-शांती...' म्हणतात म्हणून यांना शांत समजू नका, क्रांती... क्रांती... !''

**– महामंडलेश्वर आचार्य श्री सुनील शास्त्रीजी महाराज**



''आमचे परम पूज्य बापूजी भारताचा गौरव आहेत, हिंदू धर्माचा गौरव आहेत.'' **– स्वामी श्री ओमजी महाराज, अध्यक्ष, 'हिंदू राष्ट्रनिर्माण महासंघ'**



''ज्या संस्था भारताच्या विकासाचे काम करीत आहेत, त्यांच्यावर कुठाराघात केला जात आहे. पूज्य बापूजींसारख्या महापुरुषावर असे तुच्छ आरोप लावले जातात ! हे आम्ही सहन करणार नाही.''


**– श्री महंत स्वामी विश्वेश्वरानंदजी, अध्यक्ष, 'अखिल भारतीय संत समिती', गुजरात राज्य**

''पूज्य बापूजी आमचे विश्वगुरू आहेत. **जहाँ राम तहाँ नहीं काम ।** जेथे साक्षात् आशाराम बसले आहेत तेथे कामाचे काय काम ? हा जितका दुष्प्रचार आहे त्याच्यामागे पैसा




आहे, राजनैतिक व धर्मांतरण करणाऱ्या शक्ती आहेत आणि अनेक एनजीओज्चे रूप घेऊन पसरलेले भारतीय संस्कृतीला नष्ट करणारे षड्यंत्रकारी आहेत.''

**– महामंडलेश्वर श्री परमात्मानंदजी महाराज**



''दुष्ट लोक हा जो अपमान करीत आहेत तो बापूजींचा अपमान नसून हिंदू समाजाचा अपमान आहे, भारताचा अपमान आहे.''

**– श्री प्रमोद मुतालिक, अध्यक्ष, 'श्रीराम सेना'**



''पूज्य बापूजींसारखे संत तर कामवासनेपासून हजार कोस दूर राहतात. त्यांच्यावर असे घृणित आरोप लावणे किती दुर्दैवाची गोष्ट आहे.'' **– श्री परमेश्वरदासजी महाराज, उपाध्यक्ष, 'अखिल भारतीय संत समिती'**



''काही राजनेता आणि विकाऊ मीडियावाले देशाला बरबाद करण्याच्या कामी लागले आहेत, आपल्या संतांचा अपमान करण्यात लागले आहेत. आता तुम्ही जागृत व्हा आणि जागृत करा, भ्रामक प्रचाराकडे लक्ष देऊ नका.''

**– डॉ. मस्त बाबाजी, 'श्रीकृष्ण प्रणामी संप्रदाय'**



''लाखो-करोडो भक्तांना व्यसनमुक्त करविणारे, अध्यात्माचा दीपक प्रज्वलित करणारे आहेत बापू ! त्यांच्यावरील हे आरोप खूप मोठे षड्यंत्र आहे.''

**– युवा क्रांतिद्रष्टा संत दिनेश भारतीजी**



**''यकीन मानो बापूजी सच्चे हैं, अच्छे हैं, अल्लाह के नेक बंदे हैं ।''**

**– मौलाना बिलाल अब्दुल करीम कादरी**

''आज या जगातील बेईमानीचा, दुष्कृत्यांचा जर सर्वांत मोठा शत्रू कोणी असेल



तर बापूजी आहेत. म्हणून त्यांच्यावर सर्वांत जास्त हल्ले (षड्यंत्र) होत आहेत. सुरत आश्रमात इ.स. २००६ च्या गुरुपौर्णिमेला मी कॅमेऱ्यासमक्ष सांगितले होते की 'बापूजी ! आता तुमच्या विरुद्ध षड्यंत्र सुरू झाले आहेत आणि लवकरच तुमची अशी-अशी बदनामी होईल की तुम्ही विचारही करू शकत नाही.' त्यावेळी मी डांग (गुज.) क्षेत्रातून आलो होतो, तेथे बापूजींनी धर्मांतरण रोखण्यासाठी खूप मोठे काम केले होते. गेल्या १० वर्षांमध्ये या देशाला गुलाम बनण्यापासून रोखण्यात सर्वांत मोठी जी शक्ती आहे ती आहे आशारामजी बापू ! याच कारणास्तव हे सर्वाधिक निशाण्यावर आहेत. अशा वेळी आपण सर्वांनी पूज्य बापूजींना साथ देणे आवश्यक आहे.

मी हेच सांगू इच्छितो की हे सर्व चॅनल्स् दोन कारणांनी असा दुष्प्रचार करतात. एक तर मोठे कारण आहे स्पाँसरशिप, दुसरे कारण आहे टीआरपी. एक सोपे काम आहे, जेव्हाही अशी न्यूझ सुरू होईल तेव्हा देशाच्या करोडो भक्तांनी ते-ते चॅनल बंद करावे. जर ६ कोटी साधकांनी असे चॅनल बंद केले तर हे सर्व उलट-सुलट बोलणारे बंद होतील. दुसरे काम, सोशल मीडियात अशा चॅनल्स्चे जे पेज आहेत त्यांना डिस्लाईक करावे, त्या पेजेसवर आपले मत मांडावे. तिसरे काम, अशा संमेलनांचे आयोजन तालुका, जिल्हा, राज्य पातळीवर, विविध ठिकाणी करावे. शेवटी आजही टी.व्ही. हूनही कित्येक पटीने जास्त परिणाम प्रत्यक्ष सत्संगाचा होतो. सत्य आणखी मजबूत होईल. या लढाईसाठी मीडियात आणखी चांगल्या लोकांची गरज आहे, 'सुदर्शन' सारख्या कित्येक चॅनल्स्ची गरज आहे.''

**– श्री सुरेश चव्हाणके, चेअरमन, 'सुदर्शन चॅनल'**



''हा बापूजींवर हल्ला नसून संत-समाजावर हल्ला आहे.''

**– महात्यागी रामबालकदासजी,**
**अधिपती, पाटेश्वर धाम**

# ते म्हणतात...



''साधुसंतांविषयी अनेक आरोप लावण्याची परंपरा देशात वाढली आहे. तुम्ही कोणत्या मौलवीवर, ख्रिश्चन पाद्रीवर आरोप लावताना पाहिले आहे ? ...आणि आशारामजी बापूंचे जीवन खूपच सात्त्विक संताचे जीवन आहे.''

**– श्री प्रवीण तोगडिया,**
**आंतरराष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष, वि.हिं.प.**



''बापूंविरुद्ध राजनैतिक षड्यंत्र होत आहे. सुरुवातीपासूनच ते एका राजनैतिक पार्टीच्या निशाण्यावर आहेत.''

**– डॉ. रमण सिंह, मुख्यमंत्री, छ.ग.**



''पूज्य बापूजींना विनाकारण हैराण करू नका.''

**– श्री उद्धव ठाकरे,**
**शिवसेना प्रमुख**



''कोणावरही अशा प्रकारचा आरोप लावणे सोपे आहे. आज संत आशारामजींचे अनुयायी संपूर्ण जगात आहेत. अशा घटनेमुळे त्यांच्या छबीला किती ठेच पोहोचेल ही समजण्याची गोष्ट आहे. घटना सांगतात जोधपूरची आणि ५ दिवस मुलगी व तिचे कुटुंबीय दिल्लीत राहिले, कोठे-कोठे राहिले कोणालाच ठाऊक नाही. त्यानंतर दिल्लीत तक्रार नोंदविली, राजस्थानात का नाही ? हे षड्यंत्रच असू शकते.'' **– श्री कैलाश विजयवर्गीय,**
**वाणिज्य, उद्योग व सूचना तंत्रज्ञान मंत्री (म.प्र.)**



''माझे असे मत आहे की आशारामजी बापूंना कोणत्या ना कोणत्या षड्यंत्राचे शिकार बनविले जात आहे आणि याचा निष्पक्ष तपास झाला तर असे दुवे बाहेर निघतील की ज्यामुळे आपले बापू निर्दोष सिद्ध होतील.'' **– श्री नरोत्तम मिश्र, आरोग्यमंत्री (म.प्र.)**

# अन्यायाविरुद्ध आवाज बुलंद करण्यासाठी रस्त्यांवर उतरल्या विविध संघटना

पूज्य बापूजींवर खोटे, कपोलकल्पित आरोप लावून त्यांना तुरुंगात पाठविण्याच्या षड्यंत्राच्या विरोधात अनेक सामाजिक व धार्मिक संघटना रस्त्यांवर उतरल्या आहेत आणि विविध ठिकाणी वेगवेगळ्या माध्यमांनी शांतिपूर्ण पद्धतीने विरोध व्यक्त करीत आहेत. देशाच्या विविध राज्यांमध्ये श्री योग वेदान्त सेवा समिती, युवा सेवा संघ, हिंदू जनजागृती समिती, विश्व हिंदू परिषद, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, सनातन संस्था, जैन राष्ट्रीय युवक सेना, विश्व लोकार्पण बहुउद्देशीय सेवा संघ, राष्ट्रीय वारकरी सेना, भारत स्वाभिमान, संकल्प मित्र मंडळ, हिंदू साम्राज्य सेना, बजरंग दल, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, शिवसेना, पतंजली योग समिती, सावरकर प्रतिष्ठान, हिंदू विधिज्ञ परिषद, हिंदू एकता आंदोलन, श्रीराम सेना, स्वातंत्र्यवीर सावरकर स्मृती प्रतिष्ठान, समस्त हिंदू आघाडी इ. कित्येक संघटनांच्या विविध शाखांनी विरोध-प्रदर्शनांद्वारे समाजाला सत्याशी अवगत करविले व बापूजींविरुद्ध षड्यंत्र तसेच दुष्प्रचार करणाऱ्यांप्रती विरोध व्यक्त केला.

विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, धर्म जागरण, हिंदू क्रांती दल, हिंदू जागृती मंच, युवा जागृती मंच, भगवान वाल्मीकी युवा दल, सत्गुरू कबीर मुख मंदिर ट्रस्ट, हिंदू धर्म रक्षा समिती, सनातन धर्म सभा व गीता जयंती उत्सव सभेच्या अधिकाऱ्यांनी जालंधर येथे प्रेस कॉन्फ्रेंस केली आणि दुसऱ्याच दिवशी विशाल रॅलीद्वारे विरोध प्रदर्शन केले.

जंतर-मंतर (दिल्ली) येथे सनातन संस्कृती दल, सार्थक महिला संघटना इ. विविध संघटनांच्या तत्त्वावधानात सत्याग्रह आणि विशाल संत-संमेलन झाले. यात देशाच्या अनेक संतांनी निर्दोष पूज्य बापूजींवर होत असलेल्या अत्याचाराच्या विरोधात आवाज उठविला आणि तत्काळ त्यांच्या सुटकेची मागणी केली.

पंजाबमध्ये तेथील प्रसिद्ध संतांनी बापूजींवर लागलेल्या आरोपांच्या तसेच षड्यंत्राच्या विरोधात संत-संमेलन करून आपला आवाज उठविला. या संत संमेलनात 'प्रधान विरक्त वैष्णव' मंडळाचे महामंडलेश्वर १००८ महंत श्री गंगादासजी महाराज, षड्दर्शन संत समाजाचे महासचिव महंत शंभूनाथजी शास्त्री, उदासीन आश्रमाचे महंत बाबा राजकिशोरजी, षड्दर्शन संत समाजाचे सचिव महंत केशवदास महाराज, विरक्त वैष्णव मंडळाचे सचिव महंत बलिरामदास महाराज, विरक्त वैष्णव मंडळाचे कार्यकारी सदस्य स्वामी रामचंद्रदास महाराज इ. अनेक संत उपस्थित होते.

जागेअभावी आम्ही येथे सर्वच संघटना व ठिकाणांची नावे देऊ शकलो नाही. अन्य अनेक ठिकाणी झालेल्या विरोध प्रदर्शन व रॅलींच्या छायाचित्रांसाठी अवश्य पहा या मासिकाचे मुखपृष्ठ व आश्रमाची वेबसाईट www.ashram.org ❐

## ते म्हणतात...

''एक षड्यंत्र सुरू आहे, देशाच्या जनतेला भ्रमित करीत आहेत. पूज्य बापूजींवर विदेशी



शक्तींनी, षड्यंत्रकाऱ्यांनी जे षड्यंत्र यावेळी चालविले आहे, ते खूपच निंदनीय आहे. आज आपल्यासाठी ही मोठ्या खेदाची बाब आहे की यांनी कोणत्याही ठोस पुराव्याविना जोधपूरच्या तुरुंगात इतक्या दिवसांपासून ठेवले आहे आणि अशी वागणूक तर यांनी कधी दहशतवाद्यांसोबतही केली नसेल जशी हे बापूजींसोबत करीत आहेत.

बापूजी आपले राष्ट्रसंत आहे आणि षड्यंत्र करून त्यांना तुरुंगात पाठविले आहे. आम्ही हा आवाज बुलंद करीत आहोत की लवकरात लवकर बापूजींची तुरुंगातून सुटका करावी.''

**– महंत श्री घनश्यामानंदजी महाराज,**
**अध्यक्ष, 'डिव्हाईन वैदिक असोसिएशन'**

**(प्रत्येक मानवताप्रेमीने, देशप्रेमीने हे अवश्य वाचावे.)**

## पूज्य बापूजींना बदनाम करण्याचे

# सुनियोजित षड्यंत्र

गेल्या ५० वर्षांपासून संयम-साधना व सत्संगाचा महिमा जनमानसांपर्यंत पोहोचविणारे तसेच गत ८ वर्षांपासून संपूर्ण विश्वातील तरुणांना ओज-तेजाचा विनाश करणाऱ्या 'व्हॅलेंटाईन डे' ऐवजी १४ फेब्रुवारीला 'मातृ-पितृ पूजन दिवस' साजरा करण्याची सुंदर प्रेरणा देणारे पूज्य संत श्री आशारामजी बापू संयम, स्नेह, ब्रह्मचर्य, ब्रह्मनिष्ठा व लोक-कल्याणाचे मूर्तिमंत स्वरूप आहेत. परंतु भारतीय संस्कृतीच्या विरुद्ध कार्य करणाऱ्या विधर्मी शक्ती तसेच ज्यांना भारतीयांच्या नैतिक व सांस्कृतिक उन्नतीमुळे मोठे नुकसान होते ते मीडियाच्या माध्यमातून कोट्यवधी रुपये खर्च करूनही वेळोवेळी संतश्रींविरुद्ध मोठमोठे षड्यंत्र रचत आले आहेत.

अशाच एका सुनियोजित षड्यंत्रानुसार २० ऑगस्टला उत्तर प्रदेशच्या एका मुलीला 'मोहरा' बनवून तिच्याद्वारे छेडखानीचा खोटा आरोप लावण्यात आला आणि असे पसरविण्यात आले की बलात्काराचा आरोप लावला आहे. अधिकांश मीडियाद्वारे खोट्या, निराधार आणि बापूजींची छबी खराब करणाऱ्या बातम्या पसरवून करोडो देशवासींच्या धार्मिक भावनांना ठेच पोहोचविण्यात आली.

### कसे सुरू झाले घृणित षड्यंत्र ?

उत्तर प्रदेशची मुलगी, जी मध्य प्रदेशात शिकत होती, जोधपूर (राजस्थान) मध्ये तिच्याशी छेडखानी झाली असा एफआयआर नोंदविते, कोठे जाऊन ? दिल्लीच्या कमला मार्केट पोलीस ठाण्यात पोहोचून ! तोसुद्धा ५ दिवसांनी रात्री २-४५ वाजता !

मुलीच्या एफआयआर मध्ये स्पष्ट किंवा अस्पष्टपणे कोठेही कोणत्याही प्रकारे दुष्कर्माचा (रेप) उल्लेख नाही. परंतु प्रसार-माध्यमांच्या आधारे 'रेप झाला आहे' आणि 'मेडिकल टेस्टमध्ये रेपची पुष्टी झाली आहे' अशा खोट्या बातम्या पसरविण्यात आल्या.

मुलीच्या मेडिकल तपासणी रिपोर्टात रेपची गोष्ट पूर्णतः खारिज करण्यात आली आहे. असे असूनही रेपचे गैर जामीन कलम ३७६ लावण्यात आले, जे पूज्य बापूजींना बदनाम करण्याचे एक सुनियोजित षड्यंत्र आहे. या गोष्टीसाठी राजस्थान पोलिसांनी दिल्ली पोलिसांना फटकारले तसेच जोधपूर पोलीसचे डीसीपी अजय पाल लांबा यांनीही स्पष्टपणे स्वीकारलेही की दिल्ली पोलिसांनी केस चुकीच्या पद्धतीने नोंदविली आहे.

दिनांक २७ ऑगस्टला पूज्यश्री इंदोर आश्रमात होते. तेथे 'समन्स' देण्यात आला की ३० तारखेपर्यंत जोधपूरला यायचे आहे. त्याच वेळी बापूजींनी कित्येक महत्त्वपूर्ण कारणे दर्शवित थोडी मोहलत मागितली होती आणि 'समन्स' देणाऱ्याने त्या अर्जावर आपले हस्ताक्षरही केले होते की 'आम्ही हे निवेदन पुढे पोहोचवू.' बापूजी पूर्वनिर्धारित जन्माष्टमी कार्यक्रमानिमित्त २८ ऑगस्टला सुरत आश्रमात होते.

### आपल्या कर्मयोगी शिष्याच्या अंतिम संस्कारासाठी भोपाळला गेले

मध्य प्रदेशातील कित्येक आश्रमांचे सेवा-प्रभारी, सेवानिष्ठ साधक, भोपाळ आश्रमाचे वरिष्ठ पदाधिकारी आणि नारायण साईंचे सासरे श्री देव कृष्णानी हे षड्यंत्र सहन करू शकले नाही. राजस्थान पोलिसांचा छिंदवाडा गुरुकुलाच्या मुलींवर मानसिक दबाव, धाकधमकीद्वारे जबरदस्ती मनाजोगे बयान घेण्यासारख्या कृत्यांनी तसेच पूज्य बापूजींच्या अटकेसाठी षड्यंत्रकाऱ्यांद्वारे रचलेल्या घृणित षड्यंत्रामुळे त्यांना खूप मोठा आघात बसला. त्यांच्या धार्मिक भावना दुखावल्यामुळे त्यांनी अन्न-जल त्यागले होते. आपल्या हृदयाची पीडा भोपाळच्या

कलेक्टरला निवेदनाच्या रूपात सांगितली आणि जेव्हा पीडेचे काहीच निराकरण होत नसल्याचे दिसले तेव्हा हार्ट अटॅकमुळे त्यांनी आपले प्राण सोडले. खोट्या कल्पित कहाण्या बनविणाऱ्यांनी दोन दिवसांपासून अन्न-जल त्यागून बसलेल्या या सेवायोगी साधकाचे प्राण घेतले. २९ ऑगस्टला पहाटे ३.२० वाजता त्यांनी देह ठेवला. कुप्रचारापूर्वी ते पूर्णतः स्वस्थ होते. देशभराच्या साधकांनी या घटनेचा शोक व्यक्त केला. त्यांनी विनंती केली की अशा प्रकारच्या कपोलकल्पित, खोट्या बातम्या पसरवू नये, जेणेकरून आम्हाला आमच्या महत्त्वपूर्ण, राष्ट्रसेवी साधकांना अशा प्रकारे गमवावे लागणार नाही.

पूज्य बापूजी देव कृष्णानींच्या मृत्यूची बातमी ऐकून त्यांच्या अंतिम संस्कारासाठी जन्माष्टमी कार्यक्रम अर्ध्यातच सोडून सुरतहून भोपाळला गेले. त्यांना फक्त मुलीच होत्या, म्हणून बापूजी, इतर नातेवाईक आणि साधकांनी त्यांना खांदा दिला.

## पूज्य बापूजींना अटक करण्याचे घृणित षड्यंत्र

राजस्थान पोलिसांना मोहलत वाढविण्याची सूचना देण्यात आली होती. कोणतेही उत्तर न मिळाल्याने बापूजींनी ३० तारखेचे जेट एअरवेजचे तिकीट काढले होते. परंतु ट्रायजेमिनल न्यूराल्जिया (आयुर्वेदानुसार अनंत वात) च्या भयंकर पीडेमुळे तिकीट कॅन्सल करावे लागले. ही पीडा प्रसूती व हार्ट अटॅकच्या पीडेहूनही अधिक भयंकर असते. यात थोड्याशा बेसावधपणामुळे व्यक्तीचा मृत्यूसुद्धा ओढवू शकतो. इंटरनेटवर सर्वांत पीडादायी रोगाच्या रूपात याचे वर्णन येते. तरीही सायंकाळी भोपाळहून व्हाया दिल्ली जोधपूर जाण्यासाठी बापूजी भोपाळ एअरपोर्टवर पोहोचले. परंतु मीडिया व लोकांच्या गर्दीत फसल्यामुळे बोर्डिंग काऊंटर बंद झाले. तिकिटांच्या रूपात याचा पुरावाही आमच्याकडे आहे.

परिश्रम, जागरण, तणाव असूनही बापूजी बाय रोड इंदोर आश्रमात गेले. कोणत्याही अनोळख्या ठिकाणी गेले नाही. असे असूनही भलतेच पसरविण्यात आले की ते पळून गेले वगैरे. मध्य प्रदेशचे पोलीस ३१ तारखेला सकाळी सुमारे ६ वाजताच आश्रमात येऊन ठेपले होते आणि कुटियेला शेकडो पोलिसांनी घेराव घातला होता. दुपारपर्यंत मोठ्या संख्येत भक्त गोळा झाले होते.

३१ तारखेला रात्री इंदोर आश्रमाच्या व्यासपीठावरून दिलेल्या जाहिर सत्संगात बापूजींनी १६७ देशांना 'इंटरनेट लाईव्ह' द्वारे संदेश देताना खुलेआम म्हटले : ''आम्ही जोधपूर पोलिसांची वाट पाहत आहोत आणि त्यांचे स्वागत करतो. काही कारणास्तव शरीरात अचानक वेदना सुरू झाल्याने जाऊ शकलो नाही. ती पीडा अजूनही तशीच सुरू आहे.''

पूज्यश्रींचा रक्तदाब १६०/१२० होता. हृदयात जडपणा आणि छातीत दुखतही होते. वैद्यांनी पोलिसांना विनंती केली की आम्हाला डॉक्टरांना बोलवायचे आहे. डॉक्टर आले.

जोधपूर पोलीस आश्रमात पोहोचले. बापूजी त्यांना म्हणाले : ''तुम्ही निश्चिंत रहा. आम्ही पळून जाणार नाही, आम्ही पळपुटे नाही. आम्ही वचन देतो की तुम्हाला पूर्ण सहकार्य करू.''

पोलिसांनी म्हटले : ''उद्या सकाळी ७.५० च्या फ्लाईटने आम्ही तुम्हाला दिल्लीला घेऊन जाऊ. पुढे कनेक्टिंग फ्लाईटने जोधपूरला.'' बापूजींनी सहमती दिली.

## कपट व दांडुकेशाहीने अटक

रात्री १०.३० वाजता बापूजी आपल्या खोलीत विश्रांतीसाठी निघून गेले. ११ वाजेदरम्यान पोलिसांनी आश्रमात सर्वत्र शांतीने बसून जप-पाठ करणाऱ्या भक्तांना उठवायला सुरुवात केली. निर्दयतेने अपमानकारक शब्द बोलून आपल्या काठ्यांनी मारत पोलिसांनी भक्तांना उठवून आश्रमाचे रस्ते खाली केले. भक्तांना एका जागी बसवून चोहीकडून बॅरियर

लावण्यात आले. त्या वेळी इंदोर आश्रमात ८०० हूनही अधिक पोलीस होते. रात्री १२ वाजेपर्यंत खूप गोंधळ माजला होता. १२ वाजता पोलिसांची गाडी कुटियेत आली. पोलीस सेवकांना म्हणाले : ''आम्हाला १०-१५ मिनिटे बापूजींना प्रश्न विचारायचे आहेत. तुम्ही बाहेर बोलवा.''

सेवकांनी हात जोडून प्रार्थना केली : ''ते खूप थकलेले आहेत. विश्रांती घेत आहेत. तुम्हाला जे काही विचारायचे आहे ते सकाळी विचारा.''

पोलिसांचा दबाव वाढत गेला. जेव्हा ते मोठ्या आवाजात बोलू लागले तेव्हा गुरुदेव आपल्या खोलीतून बाहेर आले. पोलिसांनी म्हटले : ''रात्रीचे १२ वाजले आहेत. ४ दिवसांच्या 'समन्स' चा कालावधी संपला आहे. आम्ही तुम्हाला येथून घेऊन जाऊ.''

सेवकांनी म्हटले : ''तुम्हीच तर म्हटले होते की सकाळच्या फ्लाईटने घेऊन जाणार, रात्री येथेच विश्रांती घ्या. मग अर्ध्या रात्री जबरदस्ती का करीत आहात ?''

पोलीस धमकावू लागले : ''आम्ही काय तुमचे ऐकायला आलो आहोत ? वेळ पूर्ण झाला आहे, आम्ही तर तुम्हाला घेऊनच जाणार.''

गुरुदेव उठून पोलिसांच्या गाडीत बसू लागले. सेवकाकडे आपले आसन मागितले. पोलीस उद्धटपणे म्हणाले : ''काही गरज नाही आसन-वासनची, बसा...''

अंगद सेवक धावत जाऊन पाण्याची बॉटल आणि बॅग घेऊन आला. पोलिसांनी तेसुद्धा गाडीत ठेवू दिले नाही. गुरुदेवांच्या दोन्ही बाजूला, पुढे आणि मागे पोलीस बसले. पोलिसांची गाडी कुटियेच्या दारातून बाहेर निघून गेली. बाकीच्या पोलिसांनी कुटियेतील सेवकांवर लाठीचार्ज सुरू केला. भक्त गुरुदेवांच्या गाडीकडे धावले. लाठीचार्ज चालूच राहिला. गाडी आश्रमाच्या प्रवेशद्वारातून बाहेर निघून गेली. पोलिसांनी म्हटले होते की 'सकाळी घेऊन जाणार' परंतु रात्री १२-२० वाजता 'मार्शल लॉ' च्या पद्धतीने एअरपोर्टवर घेऊन गेले. रात्री १ वाजेपासून सकाळपर्यंत बापूजींना एअरपोर्टवर बसवून ठेवण्यात आले. सकाळी फ्लाईटमध्ये चढताच मीडियाने त्रास देणे चालूच ठेवले.

दिल्लीहून जोधपूरची फ्लाईट पकडून जोधपूरला पोहोचले. उतरताच कायदेशीर चौकशी सुरू झाली. त्यांना इतकेही कमी वाटले म्हणून रात्री १२.३० पर्यंत चौकशी सुरू ठेवली. ही सतत दुसरी रात्र होती की बापूजी थोडा वेळही झोपू शकले नाही. चौकशीदरम्यान बापूजींनी लैंगिक शोषणाविषयी म्हटले : ''मी असे काम करूच शकत नाही.''

पूज्य बापूजी पोलिसांच्या नजरकैदेत होते. कॅमेरे लागलेले होते. सोबत एक सेवक होता. सेवकाने पाहिले की डोक्याच्या उजवीकडे बरीच सूज आली आहे. विचारल्यावर कळले की भयंकर दुखतही आहे. रात्रभराच्या जागरणाने 'ट्रायजेमिनल न्यूराल्जिया' ची पीडा भयंकर रूप घेऊ लागली होती. जोधपूरच्या पोलीस कस्टडीत शिरोधारेचा उपचार एकमेव उपाय होता. भयंकर परिस्थिती पाहून पोलिसांनी आपला मानसिक दबाव रोखावा लागला आणि त्यांनी उपचार करण्याची परवानगी दिली. एमआरआय स्कॅनमध्येही या रोगाच्या सर्वच कारणांना जाणता येत नाही. वेबसाईटवर याच्या भयानकतेचे वर्णन मिळते. गत १३ वर्षांपासून बापूजी या भयंकर पीडेने ग्रस्त आहेत. इतक्या वर्षांमध्ये झालेल्या औषधोपचाराचे १०० हूनही अधिक रिपोर्ट नीता वैद्य यांच्याकडे आहेत. कोठे गेली मानवता ? जसा व्यवहार बापूजींशी झाला, असा कोणाशीही होऊ नये.

**''अजूनही तुम्ही मला कोठे पकडले आहे ?''**

सेवकाने पाहिले की संतश्री त्याच छोट्याशा खोलीत आपली लाल टोपी व धोती घालून फिरताना गात होते : **''मम दिल मस्त सदा तुम**

**रहना... आन पड़े सो सहना । मम दिल...''** पोलिसांना सत्संगाचे वचन ऐकवित होते, त्यांचा नियम जो आहे दररोज सत्संग करण्याचा !

पोलीस चौकशीदरम्यानही ते पोलिसांना अधूनमधून ज्ञानाच्या गोष्टी सांगत होते. एका पोलिसाने त्यांना विचारले : ''बापू ! तुम्ही तर म्हणत होता की पोलीस मला पकडू शकत नाही.''

बापूजी म्हणाले : ''ते तर आहेच, अजूनही तुम्ही मला कोठे पकडले आहे ?''

## ''हिंदू धर्माला कोणीही कदापि मिटवू शकत नाही.''

सेवकाने पूज्यश्रींना म्हटले : ''गुरुदेव ! आमचा जो विश्वास आहे की सत्याचा विजय होतो, तो तुटू देऊ नका.''

बापूजी : ''ते तर आहेच. इतिहास साक्षी आहे.''

सेवक : ''गुरुदेव ! आता आमच्याकडून हे सर्व सहन होत नाही. भक्त अत्यंत व्यथित आहेत, रस्त्यांवर उतरले आहेत.''

पूज्यश्री : ''भगवन्नामाचा जप करा.''

सेवक : ''गुरुदेव ! जर कूटनीती अशीच चालत राहिली आणि संतशिरोमणीलाच तुरुंगात डांबले गेले तर संपूर्ण संत-समाजच हळूहळू नेस्तनाबूद होईल. हिंदू धर्माची मुळेच उपटून फेकली जातील.''

पूज्यश्री (डोळे बंद, चेहरा शांत) : ''हिंदू धर्माला कोणीही कदापि मिटवू शकत नाही.''

पोलिसांनी सेवकांना खोलीबाहेर काढले. गुरुदेवांच्या श्रीचरणी प्रणाम करून ते निघून गेले.

खोलीच्या बाहेरून सेवक पाहत होते की जो कोणी पोलीसवाला जायचा, पूज्यश्री त्याला त्याच्या आरोग्याविषयी उपाय सांगत होते. त्यांच्या सहज विनोदी स्वभावानुसार ते विनोदही करीत होते. सकाळ-सायंकाळ मोकळ्या हवेत फिरण्याचा नियम आहे, तो खोलीतच फिरून पूर्ण करीत होते.

त्यानंतर सायंकाळी ४-४.३० वाजता त्यांना न्यायालयात घेऊन जाण्यात आले. ५ मिनिटांतच सुनावणी झाली - 'जेल'. पूज्यश्रींना जोधपूरच्या केंद्रीय कारागृहात नेण्यात आले.

डासांचा अतिरेक आणि रोगाच्या उपचाराअभावी या संतश्रींनी किती कष्ट सहन केले हे भगवंत जाणतो आणि तेच जाणतात. मीडियाद्वारे पसरविण्यात आले की बापूजींना तुरुंगात कूलर, पलंग वगैरेंची सुविधा दिली जात आहे. खरे पाहता असे काहीच नाही. ना कूलर, ना पलंग, ना कोणती सुविधा ! स्वतः जेल अधीक्षकाद्वारे या गोष्टीची पुष्टी झाली आहे.

खळबळ माजविणाऱ्या बातम्यांनी 'पीडिता-पीडिता' बोलून लाखो महिलांना पीडित करण्याचे काम केले आहे. कट रचून बापूंना केलेल्या अटकेने व्यथित होऊन लाखो-लाखो माता-भगिनी उपवास करीत आहेत.

हुंडा, बलात्कार वगैरेंच्या खोट्या केसेसमुळे असंख्य स्त्री-पुरुष, कित्येक निर्दोष परिवार, निर्दोष आत्मा षड्यंत्रकाऱ्यांचे शिकार होऊन कारागृहात पीडा सहन करीत आहेत. असे खोटे खटले देश व मानवतेची गळचेपी करीत नाही का ?

एका अधिकाऱ्याने सांगितले की ''बलात्काराच्या ९८% केसेस खोट्या सिद्ध झाल्या आहेत. माझ्या १२ वर्षांच्या कार्यकाळात फक्त ३ केसच खऱ्या सिद्ध झाल्या आहेत.''

## ''मी या गुरुकुलास बदनाम करून बंद करवेन''

काही दिवसांपूर्वी ती मुलगी अस्वस्थ होती. तिच्यावर उपचारही झाला. याचे पुरावेही आहेत. पुन्हा तिने मानसिक अस्वस्थता दाखविली. तिच्या मैत्रिणींकडून मिळालेल्या माहितीनुसार ती बाथरूम बंद करून तसेच रात्री उशिरापर्यंत गुरुकुलाच्या गच्चीवर फिरत तासन्तास फोनवर बोलायची.

आरोप लावणाऱ्या मुलीबद्दल छिंदवाडा गुरुकुलाच्या एका विद्यार्थिनीने सांगितले :

(शेष पृष्ठ २७ वर)



तत्त्व दर्शन

# ध्रुव आणि भगवान विष्णूंचा रहस्यमय वार्तालाप

**(मागील अंकापासून पुढे)**

महर्षी पराशर आपला शिष्य मैत्रेय याला म्हणाले : ध्रुवला जेव्हा भगवान विष्णूंनी आपल्या दर्शनाने कृतार्थ करून त्याच्या इच्छेनुसार अटळ पदाचे वरदान दिले, तेव्हा ध्रुवला तर अगोदर अटळ पदाचा अहंकार झाला. परंतु नंतर भगवद्दर्शनाच्या प्रभावाने लवकरच निरभिमानी होऊन तो भगवंताला प्रश्न विचारू लागला : ''हे स्वामी ! मी कोण आहे अटळ पद घेणारा ? तुम्ही कोण आहात अटळ पद देणारे ? ...आणि अटळ पद व जगाचे वास्तविक स्वरूप काय आहे ?''

यावर भगवान विष्णू म्हणाले : ''हे ध्रुव ! तुझा या गोष्टींशी काय संबंध ? या प्रश्नांची उत्तरे दिल्याने ना 'तू' राहतो, ना 'मी' राहतो, ना हे जग राहते, ना अटळ पद राहते. म्हणून असे प्रश्न विचारू नकोस.''

तेव्हा ध्रुव म्हणाला : ''ते काहीही असो पण कृपया मला माझ्या प्रश्नाचे यथायोग्य उत्तर द्या.''

''हे ध्रुव ! खरे पाहता ना तू, ना मी, ना हे जग आहे. ही सर्व केवळ भ्रांती आहे, सत्य नाही, जसे दोरखंडात (भ्रांतीमुळे भासणारे) सर्प वगैरे केवळ भ्रमविलास आहेत. सत्य तर एक मन-वाणीच्या पलीकडील आणि तुझा-माझा व संपूर्ण जगाचा जो साक्षीस्वरूप आहे, तोच आहे.''

हे ऐकून ध्रुव म्हणाला : ''मग तर मी उगाचच भ्रांतीमुळे असे दृढतेने मानले की तुम्ही मला अटळ पद दिले आहे. जसे कोणी स्वप्न पाहत असेल आणि त्यात स्वप्नद्रष्टा स्वतःद्वारे कल्पिलेल्या एका स्वप्नपुरुषाला अटळ पद देतो आणि स्वप्नपुरुष ते स्वीकारत असेल तर ती त्याची केवळ भ्रांती आहे.''


''हे ध्रुव ! अटळ पदाचा त्याग करू नकोस, कारण ज्ञानीला जे पदार्थ प्रारब्धाने प्राप्त होतात, त्यांतच ते प्रसन्न राहतात.''

मग ध्रुवने भगवंताला आपल्या स्वरूपाविषयी विचारल्यावर श्रीविष्णू म्हणाले : ''जसे साप दोरखंडाला किंवा आभूषण सोन्याला विचारते की माझे स्वरूप काय आहे तेव्हा मोठे आश्चर्य वाटते. जर स्वप्नातील माणसाने स्वप्नद्रष्ट्याला विचारले की 'हे स्वप्नद्रष्टा ! माझे स्वरूप काय आहे ?' आणि जर स्वप्नातील मनुष्य हात उंचावून सांगेल की 'मी स्वप्नद्रष्टारूप नाही, स्वप्नद्रष्ट्याहून भिन्न माझी स्वतंत्र सत्ता आहे.' तर त्याचे बोलणे ऐकून विद्वान लोक हसतील की 'हा निरर्थक प्रलाप करीत आहे.' अगदी असेच हे ध्रुव ! तू मला विचारतोस की 'मी कोण आहे ?' हीसुद्धा हास्यास्पद बाब आहे. अहंभाव-त्वंभावाचा माझ्यात मार्ग नाही, मी केवळ स्वयंप्रकाशस्वरूप अद्वितीय आहे.''

''हे प्रभू ! मग तर मी उगाचच देहाला कष्ट दिले. जेव्हा तुम्ही अद्वितीय आहात तेव्हा 'मी' नाही. जेव्हा 'मी'च नाही तेव्हा अटळ पदाशी, तुमच्याशी, भजनाशी आणि लोक-परलोकाशी माझे काय प्रयोजन ?''

''हे ध्रुव ! बालकवत् विलाप करू नकोस. अविद्येमुळे जे काम झाले ते झाले, त्याचा आता काय पश्चात्ताप करायचा ! जे तू केले आहे ते तुझ्या वासनेमुळेच केले आहे, मी तुला काहीच दिले नाही.''

''आश्चर्य आहे ! माझ्यासारख्या मूर्खाला, ज्ञानचक्षूंनी अंध माणसाला तुम्ही अंधकुपात टाकले. कारण तुमच्यासारख्या चैतन्याहून पृथक असलेले हे अटळ पदासह संपूर्ण जग एक प्रकारे काळोखी विहीरच आहे आणि मिथ्या आहे. म्हणून हे प्रभू ! आता तोच उपाय सांगा, ज्यायोगे मी या अंधकुपातून बाहेर पडू शकेन.'' (शेष पृष्ठ २६ वर)




# शिष्य नव्हे, सरळ गुरूच बनविले !

– पूज्य बापूजी

राजस्थानात केताजी महाराज नामक एक संत होऊन गेलेत. त्यांच्याकडे एक मुलगा आला दीक्षा घेण्यासाठी. ते म्हणाले : ''अरे, काय दीक्षा द्या ? जरा थांब, नंतर पाहू.'' मुलगाही पक्का होता. दर्शन करता-करता, गुरुमहाराजांच्या गायी चारता-चारता एक वर्ष झाले. त्याने गुरुदेवांना पुन्हा प्रार्थना केली : ''महाराज ! दीक्षा द्या.''

महाराज म्हणाले : ''नंतर पाहू.''

दोन-चार गायींपासून भरपूर गायी झाल्या. जंगलात गायी चरायला घेऊन जायचा आणि कधीकधी गुरुदेवांकडे यायचा. असे करता-करता गुरुदेवांनी त्याला आपल्या कुटीची सेवा दिली. केताजी महाराज आज दीक्षा देतील, दोन महिन्यांनंतर देतील... असे करता-करता दहा वर्षे लोटली. गुरुदेवही पूर्ण फक्कड होते आणि मुलगाही फक्कड ! मुलगा त्यांना सोडून गेला नाही आणि गुरूंनी त्याला दीक्षा दिली नाही.

एके दिवशी गुरुदेवांनी विचार केला की आता जरा पाहू. केताजी महाराज म्हणाले : ''हे बघ, जरा तो माठ उचल आणि तलावातून पाणी भरून आण.'' जुन्या काळातील घटना आहे. त्याने माठ भरून आणला. केताजी महाराजांनी विचारले : ''कोणत्या तलावातून पाणी भरून आणले ?''

तो म्हणाला : ''जवळच्या तलावातून.''

''छी ! त्यात तर म्हशीसुद्धा जाऊन बसतात.'' मारली काठी, माठ फोडून टाकला. पहाटेची पौष महिन्याची थंडी, सूर्योदयही झाला नव्हता. मुलगा तर असाही थंडीने कुडकुडत होता आणि वरून माठावर काठी मारल्याने पूर्ण माठातील पाणी त्याच्या अंगावरच सांडले. तो पूर्ण भिजला.

''मूर्ख कुठला ! त्या दुसऱ्या तलावाचे पाणी घेऊन ये.'' तो गेला, दुसऱ्या तलावाचे पाणी घेऊन आला.

''अरे ! दुसऱ्या तलावाचे पाणी आणले, पण तलावाच्या मधून आणले की काठावरून ?''

आता केताजी महाराजांना हे ठाऊक होते की तलावाच्या मधोमध गेला तर हा बुडून मरेल, पाणी काठावरूनच भरायचे असते.

''गुरुदेव ! मी तर काठावरून भरून आणले.''

''अरेरे रे... !''

मारली काठी. तो मुलगा पुन्हा भिजला. असेच काही ना काही निमित्त करून सात वेळा माठ फोडला. थंडीमुळे तो मुलगा गारठून गेला, पण त्याने गुरुद्वार सोडले नाही.

''आता जा, निघून जा तू तुझ्या घरी ! जाऊन कामधंदा कर. बाबा लोकांच्या मागे काय लागतोस ? पण जाता-जाता एक माठ पाणी तर देऊन जा गुरूंना.''

पुन्हा एक माठ त्याच्या हाती दिला. तो तलावाकाठी गेला, माठ बाजूला ठेवून बसून राहिला. बिचारा थंडीने कुडकुडत होता. विचार केला की 'आता पुन्हा गेलो तर थंडीने मरूनच जाईन.' मनात विचार आला : 'अरे, चल पळ येथून ! गुरुदेव आठव्या माठालाही मारतील काठी. शरीरात तर आता त्राणच उरले नाही. मी पळून जाऊ की आणखी काय करू ?'

तो हळूच उठला आणि गुरूंच्या आश्रम-परिसराला नमस्कार करून जाऊ लागला तोच माठातून आवाज आला : ''ए ! कुठे जातोस ?''

त्या मुलाला वाटले की 'या माठातून

गुरुदेवांचा आवाज कसा येत आहे ! नाही, हा माझ्या मनाचा भ्रम आहे. गुरुदेव तर आश्रमात केता कुटीत आहेत.' थोडा पुढे जाऊ लागला, पुन्हा आवाज आला : ''अरे, ऐकत नाहीस !''

मग गुरूमहाराजांचे सूक्ष्म शरीर म्हणा, योगशक्ती म्हणा, ईश्वराची लीला म्हणा, तो माठ आपली गाथा सांगू लागला : ''मी कुदळ आणि फावड्यांनी मातीच्या ढिगातून कापलो गेलो, मग कुंभाराने माझ्यावर पाणी ओतले, मला तुडविले. मग चाकावर फिरविले आणि पुढे-मागे हात ठेवून, मारून-मारून मला माठ बनविले. मग उन्हात सुकविले. त्यानंतर मला भट्टीत टाकले आणि भाजले. इतके-इतके सहन केले तरीही मी दृढ राहिलो तेव्हा आज तुझ्यासारख्या भक्ताच्या डोक्यावर बसण्याची संधी लाभली आणि तू मला सोडून जात आहेस !''

तो मुलगा विचार करू लागला, 'हे काय आहे ?'

अरे, तुझी पुण्याई आहे म्हणून माठाच्या रूपात भगवंत तुला प्रेरणा देत आहे. गुरूमहाराजांची सत्ता म्हणा, गुरूमहाराजांचे चैतन्य म्हणा... तेच तुला प्रेरणा देत आहे.

मग आवाज आला : ''चल, भर पाणी ! पळपुटा का बनतोस ?''

त्याने माठ उचलला, 'जय गुरूमहाराज !' बोलून पाणी भरले आणि गुरूमहाराजांच्या चरणी पोहोचला.

केताजी महाराज म्हणाले : ''काय रे ! आणले का पाणी ?''

''हो गुरुदेव ! आणले आहे.''

''तू घरी पळून जात होतास ना ?''

''हो गुरुदेव !''

''मग काय झाले ?''

''या माठातून आवाज आला.''

केताजी महाराज म्हणाले : ''भगवंत कसा समर्थ आहे ! जड वस्तूमधूनही ध्वनी प्रगट करू शकतो, चेतनमधूनही करू शकतो. कसा रक्षक, पोषक आहे ! कसा सर्वनियंता आहे !

तुला शिष्य का बनवू ? तू कोण आहेस, जरा विचार कर. शिष्य का बनावेसे वाटते ? **'कौन गुरु कौन चेला, चलाचली का मेला ।'**

मुलगा केताजी महाराजांकडे पाहत आहे, केताजी मुलाकडे पाहत आहेत. गुरूंनी आपल्या ब्राह्मी स्थितीचे स्फुरण केले. त्याचे ज्ञानचक्षू उघडले. मुलगा सरळ गुरूच बनला, शिष्य बनलाच नाही ! केताजी महाराजांनी त्याला शिष्य बनविले नाही, सरळ गुरूच बनविले. माझ्यासोबतही असेच घडले. माझ्यासाठीही गुरुदेवांनी काही शिष्य वगैरेंचे विधी-विधान केले नाही. बस आज्ञा केली. मी दृढ राहिलो त्यातच, त्यामुळेच अंतरात्म्याचे सुख मिळाले. ❐

## जीवन संजीवनी

**– श्री परमहंस अवतारजी महाराज**

**✻ पूर्ण सद्‌गुरूंचा संकल्प अखिल ब्रह्मांडांपर्यंत पोहोचतो. ते आपल्या खऱ्या सेवकाला लोक-परलोकात मदत करतात.**

**✻ तुम्ही आपले मूल्यांकन करा की तुमच्यात गुरुवाक्यांप्रती, गुरुप्रसादाप्रती प्रेम वाढत आहे की मायावी मोह ? सद्‌गुरूंचे प्रेम तुम्हाला ईश्वराशी एकाकार करेल आणि मायावी मोह चौऱ्याऐंशीच्या चक्रात ढकलेल.**

**✻ खरा सेवक हरघडी सद्‌गुरूंचे स्मरण करतो, म्हणून अंतसमयी यमदूत त्याच्या जवळ जात नाहीत.**

**✻ जे लोक गुरुमती आणि भगवन्नाम जप सोडून मनाप्रमाणे कर्म करतात, ते कर्मफळापासून वाचू शकत नाहीत. शब्दाभ्यासावाचून (ॐ/भगवन्नाम उच्चारण व जप) कर्मांचे मूळ कापता येत नाही.**




# ती अधीनता जिच्यामुळे परम स्वाधीनता !

– पूज्य बापूजी

पंचभौतिक शरीर मायेचे आहे. मन, बुद्धी, अहंकारही माया आहेत. ही अष्टधा प्रकृती आहे. भगवंत म्हणतात की 'ही अष्टधा प्रकृती मी नाही, तेव्हा तूसुद्धा ही नाही.' भगवंताचे वचन माना.

**भूमिरापोऽनलो वायुः खं मनो बुद्धिरेव च ।**
**अहंकार इतीयं मे भिन्ना प्रकृतिरष्टधा ॥**

**(गीता : ७.४)**

ही प्रकृती, पंचभौतिक शरीर, मन, बुद्धी, अहंकार माझ्यापासून भिन्न आहेत, तेव्हा तुमच्यापासूनही भिन्न आहेत. शरीर, मन, बुद्धी बदलतात, तुम्ही बदलत नाही, तुम्ही त्यांना जाणता. 'मी दुःखी आहे, मी सुखी आहे' हा अहंकारही बदलतो. 'मी चिंतित आहे, मी गरीब आहे, मी श्रीमंत आहे' हा अहंकारही बदलतो. हे आठही बदलतात तुमचे आणि भगवंताचेही ! ...तर जो भगवंताचा आत्मा आहे तोच तुमचा आत्मा आहे आणि शरीर भगवंताचेही राहिले नाही तर तुमचे कुठपर्यंत राहील ?

तुम्ही शरीर नाही, तुम्ही अमर आत्मा आहात. जसे भगवंत स्वतःला जाणतात तसेच तुम्हीसुद्धा स्वतःला जाणा. गुरू स्वतःला जसे जाणतात तसेच स्वतःला जाणा. मृत्यूला घाबरू नका, कोणालाही घाबरवू नका. मूर्ख बनू नका, इतरांना मूर्ख बनवू नका. दुःखी होऊ नका आणि इतरांसाठीही दुःख बनवू नका.

स्वतःला दुःखी करण्याचा अर्थ काय ? मूर्खपणाशिवाय दुःख होऊच शकत नाही. मूर्खपणाशिवाय चुकीचे निर्णय होऊच शकत नाहीत. जेव्हाही चुकीचे निर्णय घेतले जातात तेव्हा त्यांच्या मुळाशी मूर्खपणाच असतो. यामुळे दुःख होते. दुःखी होऊन निर्णय घ्यायचा नाही, द्वेषग्रस्त होऊन निर्णय घ्यायचा नाही, चिंतातुर होऊन निर्णय घ्यायचा नाही, भयभीत होऊन निर्णय घ्यायचा नाही.

सकाळी स्नानादीतून निवृत्त होऊन सूर्याला अर्घ्य देऊन ध्यानाद्वारे गुरूंशी तादात्म्य साधून मग निर्णय घेतला तर दुर्गती होत नाही. नाहीतर वारंवार पानमसाला... दुर्गती आहे ! पुनःपुन्हा सिगारेट, पुनःपुन्हा सिनेमा... इच्छा नसतानाही तेच करता. हे काय आहे ? या सवयी तुमच्यावर वर्चस्व गाजवितात. तुम्ही सवयींच्या आदेशानुसार चालू नका, शास्त्रांच्या आदेशानुसार आचरण करा, गुरूंच्या आदेशानुसार आचरण करा, ईश्वराच्या आदेशानुसार आचरण करा.

आपण ईश्वर, शास्त्र आणि गुरूंच्या अधीन होतो, ती अधीनता नव्हे, परम स्वाधीनता आहे. कारण आपणच स्वीकारलेली आहे. सत्याची अधीनता ही अधीनता राहत नाही. शास्त्रांची अधीनता ही अधीनता राहत नाही. प्रभू श्रीराम शास्त्रांच्या अधीन राहत होते. भगवान श्रीकृष्ण शास्त्रांनुसार आचरण करीत होते, माझे गुरुदेवही करीत होते. ...तर शास्त्र, भगवंत आणि गुरूंच्या आज्ञेनुसार आचरण करणे ही अधीनता नाही. वासनांची अधीनताच खरी अधीनता आहे.

जे शास्त्र, गुरू आणि भगवंताच्या आज्ञेचे उल्लंघन करतात, ते मग वासनांच्या आज्ञेत चालतात, मूर्खपणाच्या आज्ञेत चालतात, चुकीच्या निर्णयांच्या आज्ञेत चालतात आणि त्यांची मती मारली जाते. जे मनमुख असतात ते शेवटी गांडुळापर्यंतच्या तुच्छ योन्यांमध्ये जातात, पतंगापर्यंतच्या तुच्छ योन्यांमध्ये जातात. परंतु जे एका ईश्वरालाच शरण जातात... ईश्वर म्हणाल

तर शास्त्र व गुरू त्यात आले. गुरू म्हणाल तर ईश्वर आणि शास्त्र त्यात आले. **दिसतात तीन, आहेत एक. 'ईश्वरो गुरुरात्मेति मूर्तिभेदे विभागिनो ।'** आकृती-भेदाने भिन्न आहेत, बाकी एकच आहेत. सत्शास्त्र म्हणाल तर ईश्वर आले त्यात. ईश्वराविना सत्शास्त्र होऊ शकते काय ? गुरूंविना सत्शास्त्र होते का ? गुरू म्हणाल तर सत्शास्त्र आणि ईश्वर आले. ...तर जे ईश्वर, गुरू आणि शास्त्राला शरण जातात, ते दुःख, शोक, भय, चिंता यांच्या डोक्यावर पाय ठेवून आत्मा-परमात्म्याचा अनुभव करतात.

दृढ निश्चय करा की 'आता मी ईश्वरमय जीवन जगेन, गुरूंच्या आज्ञेनुसार आचरण करेन.' गुरूंची आज्ञा, ईश्वराची आज्ञा, शास्त्राची आज्ञा दिसते तर सुरुवातीला अधीनतेसारखी पण असंख्य अधीनतांच्या पार पोहोचवून देते ! ❐

## पुण्यदायी तिथी

**२९ सप्टेंबर :** रविपुष्यामृत योग (सकाळी ८-१३ पासून ३० सप्टेंबर सूर्योदयापर्यंत)
**३० सप्टेंबर :** इंदिरा एकादशी (पापनाशक व पितरांची सद्‌गती करणारे व्रत)
**५ ते १३ ऑक्टोबर :** शारदीय नवरात्र
**६ ऑक्टोबर :** पूज्य बापूजींचा ४९वा आत्मसाक्षात्कार दिवस
**८ ऑक्टोबर :** मंगळवारी/अंगारक चतुर्थी (सूर्योदयापासून रात्री १२-०५ पर्यंत )
**१३ ऑक्टोबर :** दसरा/विजयादशमी (वर्षाच्या साडेतीन शुभ मुहूर्तांपैकी एक), विजय मुहूर्त (दुपारी २-२२ पासून ३-०९ पर्यंत) (संकल्प, शुभारंभ, नूतन कार्य, सीमोल्लंघनासाठी उत्तम)
**१५ ऑक्टोबर :** पापांकुशा-पाशांकुशा एकादशी (यमयातनेतून मुक्त करविणारे व्रत)
**१७ ऑक्टोबर :** संक्रांत (पुण्यकाळ : सकाळी ८-०१ पासून दुपारी ४-०१ पर्यंत)
**१८ ऑक्टोबर :** कोजागिरी/शरद पौर्णिमा, कार्तिक स्नानारंभ, मांद्य चंद्रग्रहण (१९ ऑक्टोबर पहाटे ३-१८ पासून ७-२१ पर्यंत)

# आत्ता केले नाही तर केव्हा कराल ?

– पूज्य बापूजी

तुम्ही जितका वेळ शांत बसता, निःसंकल्प बसता तितकी तुमची आत्मिक ऊर्जा, आत्मिक आभा, परमात्मिक शक्ती संचित होते, तुमचे सामर्थ्य वाढते.

एका संतश्रींना कोणीतरी म्हटले : ''आम्ही तर गृहस्थी आहोत, संसारी आहोत. आम्ही एकांतात राहू शकत नाही, सामर्थ्यवान होऊ शकत नाही.''

संतश्री म्हणाले : ''तू लोटाभर दूध सरोवरात अथवा पाण्याने भरलेल्या मोठ्या भांड्यात टाकले तर ते दूध वाया जाईल. परंतु त्याच दुधात जर थोडेसे विरजण टाकले, मग थोडे एकांतात ठेवले, नंतर दही घुसळले आणि पाण्याने भरलेल्या घागरीत अथवा सरोवरात ते लोणी टाकले तर ते तरंगू लागेल.

अगदी असेच थोडा वेळ तू साधन-भजन करून आपल्या आनंदस्वरूप आत्म्याचे सुख घे. मग संसाररूपी घागरीत व्यवहार केला तरीही हसत-खेळत आनंदाने सफल होशील, नाहीतर संसार तुला बुडवून टाकेल. चिंता आणि विकारांमध्ये, आसक्ती-द्वेषात, भय आणि व्याधींमध्ये बुडवून टाकेल आणि अखेरीस जन्म-मरणाच्या चक्रातही टाकेल.''

'काय करू ? मी तर संसारी आहे' असे करून आपले आयुष्य नष्ट करू नका. **तुम्ही खरोखरच परिश्रमाने कमविता आणि अगदी काटकसरीने जगता तर तुमचा हक्क आहे परम सुख मिळविण्याचा.**

मनुष्य-जन्माहून श्रेष्ठ असे काहीही नाही. असे मनुष्य-जीवन मिळवून आपले उच्च ध्येय गाठले नाही तर मग केव्हा गाठाल ? जे भूतकाळात झाले ते झाले. आत्तापासूनच तुम्ही शक्तीचा संचय करा, आत्मानंद वाढवा. ❐




# इंद्रियांवर विजय मिळविण्याचे पर्व : विजयादशमी

– पूज्य बापूजी

(१३ ऑक्टोबर)

## संपूर्ण विजयाचा दिवस

इंद्रियांवर विजय मिळविण्याचे पर्व, बहिर्मुख वृत्तीतून अंतर्मुख होण्याचे पर्व, अन्यायावर न्यायाच्या विजयाचे पर्व, तमोगुणावर दैवी शक्ती व सत्त्वगुणाच्या विजयाचे पर्व, दुष्कर्मावर सत्कर्माच्या प्रभावाचे पर्व, भोगावर संयम व योगाच्या विजयाचे पर्व तसेच आसुरी वृत्तीवर देवत्व वृत्ती व पशुत्वावर मानवतेच्या विजयाचे आणि जीवभावावर शिवभावाच्या विजयाचे पर्व आहे 'विजयादशमी'. आजपर्यंत मानत होतो की 'आपण जीव आहोत, आपण पापी आहोत, पुण्यात्मा आहोत, दुःखी आहोत, सुखी आहोत...'

या मान्यता जीवत्वाच्या होत्या परंतु सुख-दुःख व मान्यता येऊन-येऊन बदलून जातात, त्यांना जो जाणतो तो शिवच माझा आत्मा आहे, तो हरीच माझा आत्मा आहे. मी तुच्छ जीव नाही, हरीचा शाश्वत अंश आहे. मी अमुक जातीचा किंवा पंथाचा अथवा अमुक आकाराचा केवळ देहधारी नाही. शरीराच्या मृत्यूनंतरही राहणारा अमर आत्मा, हरीचा सनातन सुपुत्र आहे. हरि ॐ... ॐ...

सीमोल्लंघन अर्थात् आपल्या सीमेवरून शत्रूच्या सीमेत प्रवेश करणे आणि त्याच्यावर विजय मिळविण्याचा दिवस आहे विजयादशमी ! श्रीरामांनी विजयादशमीला रावणाचा वध केला होता. छत्रपती शिवाजी महाराजांनी दसऱ्याला औरंगजेबाला चांगलाच धडा शिकविला होता. रघू राजाने धरतीवर राहून भगवंताचे खजिनदार कुबेर भंडारीला आव्हान केले : ''कौत्स ब्राह्मण त्याचे गुरू वरतंतू ऋषींना १४ कोटी मोहरा अर्पण करण्याचा संकल्प घेऊन माझ्याकडे आला आहे. मला या ब्राह्मणाच्या संकल्पाची पूर्ती करायची आहे. मी क्षत्रिय आहे. तुझ्याकडे मागत नाही, तुला आदेश देतो की कर म्हणून मला १४ कोटी मोहरा दे, नाहीतर युद्धासाठी तयार हो.'' धनुष्यावर बाण चढविला. कुबेर भंडारी म्हणाले : ''नाही राजन् ! मी आत्ताच मोहरांचा वर्षाव करतो.'' आणि दसऱ्याच्या दिवशीच रघू राजा आपल्या संकल्पात सफल झाले.

विजयादशमी आपल्याला आपली पाच कर्मेंद्रिये व पाच ज्ञानेंद्रिये – या दाही इंद्रियांवर नियंत्रण मिळवून अधूनमधून अंतर्यामी परमात्म्यात विश्रांती मिळविण्याचा व तुच्छ विषय-विकारांच्या आकर्षणावर विजय मिळविण्याचा संदेश देते.

## संकल्प शीघ्र फलीभूत करण्याचा दिवस

विजयाचा दिवस विजयादशमी मुहूर्ताविनाचा मुहूर्त आहे. या दिवशी कोणतेही शुभ कार्य करण्यासाठी शुभ मुहूर्त पहावा लागत नाही. या दिवशी कोणतीही वस्तू अथवा परिस्थितीला नियंत्रित करण्याचा संकल्प लवकर फळतो. विजयाचे नक्षत्र आणि ग्रह विजय मिळवून देण्यात मदत करतात. विजयादशमी विरोधकांवर विजय मिळविण्याचा दिवस आहे. विरोधक दोन प्रकारचे असतात. एक तर बाह्य विरोधक असतात. धन-संपदा, पद व सत्तेपायी तसेच सिद्धांत, वाद आणि विवादामुळे बाह्य जगाचे विरोधक. यांच्यावर विजय मिळविणे ही खूप मोठी गोष्ट नाही. दुसरे अंतरंग विरोधक असतात. काम, क्रोध, लोभ, मोह, अहंकार, ईर्ष्या, विषाद वगैरे. हे आपले पतन करवून आपल्याकडून ते करवून घेतात जे आपण

इच्छित नाही. हे आभ्यंतर शत्रू आहेत. बाह्य शत्रू तर येथपर्यंतच आहेत, परंतु आभ्यंतर शत्रू मृत्यूनंतरही पाठलाग सोडत नाहीत.

या आंतरिक शत्रूंवर विजय मिळविण्यासाठी विजयादशमीला भगवन्नामाचा आश्रय घेऊन त्याचे थोडे गुंजन करावे, आंतरिक शत्रूंना कल्पना करून बाहेर आणावे आणि पुरुषार्थरूपी गदा किंवा भगवन्नामरूपी बाणाने त्यांना मारावे.

आभ्यंतर शत्रूंचे मूळ दोनच सूत्र आहेत - आसक्ती आणि द्वेष. ...तर दसऱ्याला बंधनमुक्त होण्याचा संकल्प करा की 'आसक्ती व द्वेषातून मुक्त होऊ, चिंता व भयापासून मुक्त होऊ.'

काय कराल ? 'जेथे आसक्ती जात नाही, द्वेष जात नाही, भय व चिंता जात नाही उलट या सर्वांना जो जाणतो आणि सर्व निघून जातात तरीही जो जसाचा तसाच आपल्यासोबत राहतो, तो **वासुदेवः सर्वं इति...** सर्वांमध्ये मज वासुदेवाची मूळ सत्ता आहे. ॐ आनंद... ॐ शांती...' अशा प्रकारे चिंतन करीत शांत झाल्याने आसक्ती व द्वेष शांत होतील. द्वेष दुसऱ्याप्रती होतो. जेव्हा सर्वांमध्ये आपला आत्मा आहे तेव्हा द्वेष कुठे टिकेल ! आसक्तीसुद्धा दुसऱ्याप्रती होते. कितीही सुंदर स्त्री किंवा पुरुष असो, स्वतःवर आसक्त होणार नाही. कितीही कुरूप स्त्री किंवा पुरुष असो, स्वतःशी द्वेष होणार नाही, दुसऱ्याशी होईल. ...तर द्वैतबुद्धी मिटविण्याचा संकल्प करा, हासुद्धा दसऱ्याचा संदेश आहे. दाही दिशांना तुमची कल्याणमय दृष्टी बनावी.

**सर्वदा सर्वकार्येषु नास्ति तेषाममंगलम् ।**
**येषां हृदिस्थो भगवान् मंगलायतनं हरिः ॥**

सर्वदा, सर्व कार्यांमध्ये त्यांच्यासाठी अमंगल असे काही नाहीच, ज्यांच्या हृदयात हृदयस्थ भगवंताची आस्था आहे. आसक्ती-द्वेषाच्या पलीकडे परमात्माच सत्य आहे अशी आस्था आहे. **मंगलायतनं...** 'आत्मदेवामुळेच हा देह चालतो आणि तोच सत्य आहे' असे जे मानतात, शरीराला मिथ्या मानतात, सुख-दुःखाला मिथ्या मानतात, 'दुःख-सुख येते आणि जाते, आसक्ती-द्वेष येतो आणि जातो तरीही जो राहतो तो 'मी' सत्य आहे.' असे जे जाणून घेतात त्यांच्यासाठी सर्वदा, सर्व कार्यांमध्ये अमंगल होतच नाही. कारण त्यांच्या हृदयात मंगलमय भगवंताचे अस्तित्व आहे. ...तर तुम्ही मंगलमय भगवंताला, आपल्या हृदयाचा जो खरा स्वामी आहे त्याला आपले माना. श्वास आत गेल्यावर भगवंताचे नाम, बाहेर आल्यावर गणती अथवा ओठांत भगवंताच्या नामाचा जप, मग कंठात, मग हृदयात... तुमच्या हृदयात **'मंगलायतनं हरिः'** चे ज्ञान, हरीत विश्रांती, हरीचा आनंद आल्याने सर्वत्र मंगलच मंगल होईल.

दसऱ्याला तुम्ही संकल्प करा की 'आता माझे जीवन मंगलमय होईल. कोणाप्रती द्वेषाचा विचार आला तर 'मंगलायतनं हरिः' चे स्मरण करून त्याला शांत करेन. आसक्ती झाली तर विचार करेन की काय आसक्ती करायची ! सिकंदर व दारासारखे मोठमोठे दिग्गजही निघून गेले. 'हे करू, ते करू...' अरे, सोन्याची लंका मिळविली तरीही आसक्ती-द्वेष गेला नाही म्हणून दरवर्षी पुतळा जाळला जातो ! दरवर्षी रावण-दहन होते. रावण तर एकदाच मरतो पण दरवर्षी समाजाला याचे स्मरण व्हावे की सोन्याची लंका मिळविल्यानंतरही जर आसक्ती-द्वेषाच्या पलीकडील 'मंगलायतनं हरिः' मध्ये स्थिती केली नाही म्हणून सोन्याची लंकासुद्धा सुख देऊ शकली नाही, मग नेत्यांच्या मोठमोठ्या आश्वासनांनी भरलेल्या भाषणांमुळे तुमचे दुःख काय मिटणार ! 'हे करू, ते करू, हा विकास करू...' नेता ! तू काहीही कर, पण तू सोन्याचे घर तर बांधू शकत नाहीस ! ...आणि सोन्याची लंका असणारा रावणही जगातून निर्दुःख गेला नाही आणि त्याचे लोकही निर्दुःख गेले नाही तर आम्हाला तुम्ही काय देणार ! आम्ही तर 'मंगलायतनं हरिः' चा आसक्ती-द्वेषातून तारून नेणारा सत्संग ऐकू आणि भगवंताच्या प्रीतीसाठी व प्रसन्नतेसाठी कर्म करू. ❐



संयम आणि ब्रह्मचर्य

# भारतीय मनोविज्ञान किती यथार्थ !

**(अंक २४६ पासून पुढे)**

आजकालचे मोठमोठे डॉक्टर आणि मनोवैज्ञानिक भारतीय ऋषी-मुनींच्या ब्रह्मचर्य-विषयक विचारधारेचे, त्यांच्या संशोधनाचे समर्थन करतात. **डॉ. ई. पॅरियर** यांचे म्हणणे आहे : ''हा एक अगदी चुकीचा आहे की 'पूर्ण ब्रह्मचर्याने नुकसान होते.' नवयुवकांच्या शरीराचे, चारित्र्याचे आणि बुद्धीचे रक्षक पूर्ण ब्रह्मचर्यच आहे.''

**इंग्लंडच्या राजाचे चिकित्सक सर जेम्स पेजन** लिहितात : 'ब्रह्मचर्यामुळे शरीर आणि आत्म्याचे काहीही नुकसान होत नाही. स्वतःला नियंत्रणात ठेवणे सर्वथा चांगली गोष्ट आहे.'

आजकालचे मनोचिकित्सक व लैंगिकशास्त्राचे ज्ञाते, जे समाजाला अनैतिकता, मुक्त साहचर्य (Free Sex) व अनियंत्रित विकारी सुख भोगण्याचा उपदेश देतात, त्यांनी डॉ. निकोलसचे म्हणणे अवश्य समजून घेतले पाहिजे. **डॉ. निकोलस म्हणतात : ''वीर्याचा पाण्यासारखा नाश करणाऱ्या आजकालच्या अविवेकी तरुणांच्या शरीराला भयंकर रोग अशा प्रकारे घेरतात की डॉक्टरांना शरण गेल्यावरही त्यांचा उद्धार होत नाही आणि शेवटी मोठ्या अवघड, भयंकर संकटांचा सामना केल्यानंतर अकालीच त्या दुर्दैवी लोकांचा महाविनाश होतो.''**

वीर्यरक्षणाने किती लाभ होतात हे सांगताना **डॉ. मोलविल कीथ (एम.डी.)** म्हणतात : ''वीर्य तुमच्या हाडांचा सार, मेंदूचे भोजन, सांध्यांचे तेल आणि श्वासाचे माधुर्य आहे. **जर तुम्ही मनुष्य असाल तर त्याचा एक थेंबसुद्धा नष्ट करू नका,** जोपर्यंत तुम्ही ३० वर्षांचे होत नाहीत आणि तेव्हाही फक्त संततीला जन्म देण्यासाठीच ! त्यावेळी स्वर्गातील प्राणधाऱ्यांपैकी कोणी दिव्यात्मा तुमच्या घरी येऊन जन्म घेईल, यात यत्किंचितही संशय नाही.''

आपल्या ऋषी-मुनींनी तर हजारो-लाखो वर्षांपूर्वी वीर्यरक्षण व संयमाने दिव्य आत्म्याला अवतरित करण्याची गोष्ट सांगितली आहे. परंतु पाश्चात्त्य बुद्धिजीवींपासून प्रभावित असलेले आपल्या देशातील सुशिक्षित लोक त्या महापुरुषांच्या वचनांवर विश्वास ठेवत नाहीत. आता पाश्चात्त्य चिकित्सकांचे म्हणणे ऐकूनही जर ते संयमाच्या मार्गाला लागले तरी आम्हाला आनंद होईल. हिंदू धर्मशास्त्रांच्या उपदेशांचा विधर्मी, नास्तिक लोक स्वीकार करणार नाहीत हे शक्य आहे; परंतु आता तर त्याच गोष्टींना वैज्ञानिक मानत आहेत आणि आपल्या भाषेत ब्रह्मचर्याची आवश्यकताही सांगत आहेत, तेव्हा याचा स्वीकार सर्वांना करावाच लागेल आणि कसेही करून का होईना पण त्यांना भारतीय संस्कृतीला शरण यावेच लागेल. यातच त्यांचे कल्याण आहे.

ब्रह्मचर्याने किती लाभ होतात हे सांगताना **डॉ. मोंटेगाजा** म्हणतात : ''सर्वच लोक, विशेषतः नवयुवक ब्रह्मचर्याच्या लाभाचे तत्काळ अनुभव करू शकतात. ब्रह्मचर्यामुळे स्मरणशक्तीचे स्थैर्य, धारणा व ग्रहण शक्ती वाढते. बुद्धिशक्ती तीव्र होते, इच्छाशक्ती बलवान होते. सच्चारित्र्याने संपूर्ण शरीरात एक अशी शक्ती येते की विलासी लोक जिची कल्पनाही करू शकत नाही. ब्रह्मचर्याने आपल्याला परिस्थिती एका विशेष आनंददायक रंगात रंगलेल्या दिसून येतात.

ब्रह्मचर्य आपल्या तेज-ओजाने जगातील प्रत्येक पदार्थाला प्रकाशमान करते आणि आपल्याला कधीही न संपणाऱ्या विशुद्ध व निर्मळ आनंदाच्या अवस्थेत घेऊन जाते, असा आनंद जो कधी कमी होत नाही.''

**(क्रमशः)** ❐

## उपासना अमृत



# सुख, शांती व पुण्य वर्धक : श्राद्ध

**(श्राद्ध : १९ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर)**

– पूज्य बापूजी

भाद्रपद महिन्यातील कृष्ण पक्षाला 'पितृ पक्ष' किंवा 'महालय पक्ष' असे म्हणतात. **श्रद्धया दीयते यत्र, तच्छ्राद्धं परिचक्षते ।** 'श्रद्धेने जे पूर्वजांसाठी केले जाते, त्याला 'श्राद्ध' असे म्हणतात.' तुमचा एक महिना व्यतीत होतो तेव्हा पितृलोकीचा एक दिवस होतो. वर्षभरात एकदा जरी श्राद्ध केले तरी कुळ-वंशातील पितरे तृप्त होतात.

### श्राद्ध का आवश्यक आहे ?

जे श्राद्ध करतात ते स्वतःही सुखी-संपन्न होतात आणि त्यांचे आजोबा-पणजोबा, पूर्वज वगैरे सर्व सुखी होतात. श्राद्धकाळात पितरे आशा बाळगतात की आमच्या मुलांनी आमच्यासाठी काही ना काहीतरी अर्पण करावे, जेणेकरून आम्ही संतुष्ट होऊ. सायंकाळपर्यंत ते इकडे-तिकडे पाहत असतात. श्राद्ध केले नाही तर ते धुत्कारून निघून जातात. मग घरात सर्व धन-संपदा असूनही काही ना काही संकट, विपत्ती कायम राहते.

'हारीत स्मृती' मध्ये येते : 'ज्याच्या घरी श्राद्ध होत नाही त्याच्या कुळ-वंशात वीर पुत्र कधीही जन्माला येत नाही. कोणी निरोगी राहत नाही. दीर्घायुषी होत नाही आणि कोणत्या ना कोणत्या प्रकारे भांडणतंटे व तणाव कायम राहतो. त्याचे कोणत्याही प्रकारे कल्याण होत नाही.'

विष्णू पुराणात लिहिले आहे : 'श्राद्ध केल्याने ब्रह्मा, इंद्र, रुद्र, वरुण, अष्टवसू, अश्विनीकुमार, सूर्य, अग्नी, वायू, ऋषी, पितृगण, पशू-पक्षी, मनुष्य आणि जगही संतुष्ट होते. श्राद्ध करणाऱ्यावर या सर्वांची प्रसन्न दृष्टी राहते.' तो इतक्या लोकांना प्रसन्न करण्यात सक्षम होतो तर तो स्वतः कसा असंतुष्ट राहील !

### जर श्राद्ध करण्याची कुवत नसेल तर...

श्राद्ध पक्षात आपल्या कुवतीनुसार श्राद्ध केले पाहिजे. चीज-वस्तू आणण्याची कुवत नसेल तर केवळ भाजीनेच श्राद्ध करावे. भाजी विकत घेण्याचीही कुवत नसेल तर हिरवे गवत कापून गोमातेला खाऊ घालावे आणि हात वर करून म्हणावे की 'हे पितरांनो ! तुमच्या संतुष्टीसाठी मी गायीला तृप्त करतो, तुम्ही यामुळे संतुष्ट व्हावे.' असे केल्यानेही त्या व्यक्तीचे भाग्य बदलेल.

गायीला चारा खाऊ घालण्याचीही कुवत नसेल तर ज्या तिथीला आई-वडिलांचे निधन झाले असेल, त्या दिवशी स्नान करून पूर्वाभिमुख होऊन दोन्ही हात वर करून म्हणावे : 'हे सूर्यनारायणा ! मी लाचार आहे. काहीही करू शकत नाही. तुम्ही माझ्या आई-वडिलांना, आजोबा-आजीला... (त्यांचे नाव तसेच त्यांच्या वडिलांचे नाव व कुळ-गोत्राचे उच्चारण करून) पूर्ण तृप्त करावे, संतुष्ट करावे.' ज्यांच्याकडे साधन-सामग्री आहे आणि स्वतःला लाचार-लाचार म्हणतात, ते लाचार बनतील परंतु जे खरोखर लाचार आहेत, त्यांच्यावर भगवंत विशेष कृपा करतात. तुमच्या प्रार्थनेने जेव्हा पितरे तृप्त व संतुष्ट होतील तेव्हा तुमच्या जीवनात धन-धान्य समृद्धी, तृप्ती-संतुष्टी येईल.

### श्राद्धाचा ऐतिहासिक पुरावा

प्रभू श्रीरामचंद्र वनवासात असताना पुष्कर येथे थांबले होते. दशरथ राजा स्वर्गवासी झाले आणि श्राद्धाची तिथी आली. श्रीरामचंद्र ऋषी-मुनींना, ब्राह्मणांना आमंत्रण देऊन आले. जी काही

कंदमुळे आणायची होती, ती लक्ष्मणाने आणली आणि सीता मातेने श्राद्धाची व्यंजने बनविली. सीता माता ब्राह्मणांना व्यंजने वाढू लागल्या आणि श्रीरामही वाढू लागले. परंतु अचानक जसे वाघाला पाहून हरिणी उडी मारून पळून जाते जंगलात, अगदी असेच सीता माताही झाडाझुडपांमध्ये जाऊन लपल्या. श्रीरामांनी त्यांच्याऐवजी लक्ष्मणाची मदत घेतली आणि ब्राह्मणांना व्यंजने वाढून भोजन करविले. जेव्हा ते सर्व निघून गेले तेव्हा घाबरलेली हरिणी जशी परत येते तशा सीता माता आल्या.

''सीते ! आजचे तुझे हे वर्तन मला आश्चर्यात टाकल्याविना राहत नाही.''

सीता माता म्हणाल्या : ''नाथ ! काय सांगू, ज्यांना श्राद्धाच्या निमित्ताने बोलावले होते ते सर्व बसले, एवढ्यात मला तुमचे पिताश्री, माझे सासरे मला त्यांच्यात दिसू लागले. आता सासऱ्यांसमोर अशी वल्कले नेसून मी कशी फिरू शकते ! म्हणून मी लज्जेने पळून गेले.'' अशी कथा येते.

## श्राद्धासाठी योग्य स्थान

गया, पुष्कर, प्रयाग, हरिद्वार तीर्थक्षेत्र अथवा गोशाळा, देवालय किंवा नदीचा काठही श्राद्धासाठी उत्तम स्थान मानले जाते. नाहीतर आपल्या घरातच परमात्मदेवाच्या नावाने पाणी शिंपडून गायीचे शेण अथवा गोधुळी, गोमूत्र वगैरेंनी सारवून मग श्राद्ध केले तरीही पवित्र मानले जाते. श्राद्धात जेव्हा तुळशीपत्रांचा वापर होतो तेव्हा पितरे प्रलयापर्यंत तृप्त राहतात आणि ब्रह्मलोकीपर्यंत जातात.

**देवताभ्यः पितृभ्यश्च महायोगिभ्य एव च ।**
**नमः स्वधायै स्वाहायै नित्यमेव नमो नमः ।।**

'देवता, पितरे, महायोगी, स्वधा आणि स्वाहा यांना माझा सर्वदा नमस्कार असो, नमस्कार असो.' **(अग्नी पुराण : ११७.२२)**

श्राद्धाच्या सुरुवातीला व शेवटी या मंत्राचे तीनदा उच्चारण केल्यास श्राद्धातील त्रुटी क्षम्य होतात, पितरे प्रसन्न होतात आणि आसुरी शक्ती पळून जातात.

## पितरांच्या संतुष्टीने सुखमय जीवन

समजा तुमच्या घरी २५ पाहुणे आले. तुम्ही सर्वांना जेवणाचा आग्रह केला. त्यापैकी काहींनी जेवण केले, काहींनी नाही केले पण तुमच्या मधुर व्यवहाराने सर्वजण तृप्त होऊन गेले. असेच तुम्हाला मी खाऊ-पिऊ घालत नाही पण तुमचे कल्याण होवो या भावनेने बोलतो आणि तुम्ही तृप्त होऊन जाता. त्या मोबदल्यात तुम्ही माझ्यासाठी काय काय तृप्तीची भावना करता. मग तुमचा संकल्पही तर काम करतो ! जसे तुम्ही देता तसेच अनंत पट तुम्हाला मिळते. श्राद्ध केल्याने पितरांना तुम्ही तृप्त करता तर तेसुद्धा तुम्हाला तृप्तीच्या भावनेने तृप्त करतात. श्राद्धकर्म करणाऱ्याचे दारिद्र्य दूर होते. रोगराई दूर करण्याची पुण्याई वाढते. घरात स्वर्गीय वातावरण बनते. आयुष्य, बुद्धी, धन, विद्या व स्वर्ग इ.च्या प्राप्तीसाठी श्राद्धकर्म लाभदायी आहे. श्राद्धाने संतुष्ट होऊन पितृगण श्राद्धकर्त्याला मुक्तीच्या मार्गावरही प्रेरित करतात.

## श्राद्धात बाळगावी ही दक्षता

* पितरांना खाऊ घातल्याविना स्वतः खाऊ नये. परान्नाचेही सेवन करू नये.

* श्राद्धकर्त्याने श्राद्ध पक्षात तांबूल भक्षण, तेल-मालीश, स्त्री-संभोग, संग्रह वगैरे करू नये.

* श्राद्धाचे भोजन करणाऱ्याने दुसऱ्यांदा भोजन तसेच प्रवास वगैरे करू नये. श्राद्धान्न सेवन केल्यानंतर परिश्रम व प्रतिग्रहापासून दूर रहावे.

* श्राद्ध करणाऱ्या व्यक्तीने ३ पेक्षा अधिक ब्राह्मणांना तसेच जास्त नातेवाइकांना बोलावू नये.

* श्राद्धकाळात ब्रह्मचर्य व सत्याचे पालन करावे आणि ब्राह्मणांनीही ब्रह्मचर्याचे पालन करून श्राद्धान्न ग्रहण करण्यासाठी यावे.

## श्राद्ध पक्षाचा संदेश

भगवंत म्हणतात : 'वैदिकरित्या जर तुम्ही माझ्या स्वरूपाला जाणत नसाल तर श्रद्धेच्या बळावर ज्या ज्या देवांच्या, पितरांच्या निमित्ताने जे काही कर्म करता, त्यांच्याद्वारे माझ्याच सत्ता-स्फूर्तीने तुमचे कल्याण होते. देवांची पूजा करणारे देवांना प्राप्त होतात, पितरांची पूजा करणारे पितरांना प्राप्त होतात. भुतांची पूजा करणारे भुतांना प्राप्त होतात आणि माझी पूजा करणारे भक्त मलाच प्राप्त होतात. म्हणून माझ्या भक्तांचा पुनर्जन्म होत नाही.' म्हणून श्राद्ध तर करा पण 'पितरांमध्ये, देवतांमध्ये जी सत्ता आहे, ती माझ्या प्रभूची आहे.' सर्वत्र प्रभूची सत्ता पाहिल्याने सर्वेश्वर प्रभूचे स्मरण होईल. तुमचे कर्म परमात्म्याला संतुष्ट करणारे होईल. ❐

## सामूहिक श्राद्धाचे आयोजन

**ज्यांना आपल्या पूर्वजांच्या निधनाची तिथी माहीत नाही, त्यांनी सर्वपितृ अमावास्येला (४ ऑक्टोबर) श्राद्ध केले पाहिजे. या दिवशी आश्रमाच्या मुख्य शाखांमध्ये 'सामूहिक श्राद्ध' आयोजित केले जाते. यात तुम्हीसुद्धा सहभागी होऊ शकता. यासाठी आपल्या जवळील संत श्री आशारामजी आश्रमात ३० सप्टेंबरपर्यंत अवश्य नाव नोंदवा. श्राद्धकर्मासाठी आवश्यक सामग्री श्राद्धस्थळी उपलब्ध केली जाईल. आपले वस्त्र, आसन सोबत घेऊन यावे. सामूहिक भोजन आश्रमातच होईल. अधिक माहितीसाठी अगोदरच आपल्या जवळील आश्रमाशी संपर्क साधावा.**

**(श्राद्धाशी संबंधित सविस्तर माहितीसाठी आश्रमाचे पुस्तक 'श्राद्ध महिमा' वाचावे.)**

## भगवान श्रीकृष्णांचे ६४ दिव्य गुण

- पूज्य बापूजी

**(मागील अंकापासून पुढे)**

भगवंताचा **आठवा** गुण आहे **'सत्यवाक्यः'**, भगवंत सत्यवादी आहेत. जरी आपल्याला समजत नसले तरीही भगवंत जे बोलतात ते सत्य बोलतात. **नववा** गुण आहे **'प्रियंवदः'**, भगवंत अपराध्याशीही मधुर वाणीत बोलतात. **दहावा** गुण आहे **'वावदूकः'**, भगवंत वक्तृत्वकलेत अतिशय निपुण आहेत. **अकरावा** गुण आहे **'सुपाण्डित्यः'**, परम पंडित आहेत भगवंत. १४ विद्यांची जणू खाण व नीतिज्ञ आहेत. पंडितांचेही प्रेरक आहेत, पंडितांनाही मार्गदर्शन करणारे आहेत. **बारावा** दिव्य गुण आहे **'बुद्धिमान्'**, भगवंत बुद्धिमानांचे शिरोमणी आहेत. **तेरावा** गुण आहे **'प्रतिभान्वितः'**, ते प्रतिभावान आहेत. **चौदावा** गुण आहे **'विदग्धः'** अर्थात् कला-पारंगत. मग ती नृत्यकला असो, वाद्यकला असो अथवा संगीतकला, युद्धकला, साधनकला किंवा साध्यकला... ते सर्वांमध्ये पारंगत आहेत. **पंधरावा** गुण आहे **'चतुरः'**, भगवंत चतुर आहेत. आजकालचे जे चतुर आहेत तसे चातुर्य नव्हे. लोक निर्दुःख कसे होतील यात भगवंत चतुर आहेत. 'लोक समतावान कसे होतील, आत्मावान कसे होतील आणि माझ्या स्वभावाला प्राप्त करून मजरूप कसे होतील ?' असे चातुर्य भगवंतात आहे. इतर लोक तर चातुर्याने स्वतःही ठकविले जातील, लोकांना ठकवून त्यांच्या चीज-वस्तू हडपतील. अशा तुच्छ चातुर्याला संसारी लोक चतुर मानतात, भगवंताचे चातुर्य तर भगवन्मय आहे. **सोळावा** गुण आहे **'दक्षः'**, भगवंत दक्ष आहेत, मोहात पडत नाहीत. पुत्र-पौत्रांना पाहून त्यांचा पक्ष घेत नाहीत. त्यांची चूक असेल तर त्यांनाही शिक्षा देण्यात सहमत असतात. ऋषींनी त्यांच्या पुत्र-पौत्रांना शाप दिला की ''तुम्ही ही गर्भवती गोपिका घेऊन आला आहात, पण खरे पाहता हा गोप आहे. याच्या पोटावर तुम्ही जे मुसळ बांधले आहे, त्यानेच तुमचा विनाश होईल.'' श्रीकृष्णांनी ऐकले तेव्हा म्हणाले : ''ऋषी जे बोलले ते बरोबर आहे. जो जसे कर्म करतो, त्याला तसेच फळ भोगू द्या.'' भगवंत तटस्थ आहेत, दक्ष आहेत. त्यांची इच्छा असती तर ते शाप अन्यथा करू शकत होते. पण नाही, दक्ष आहेत. **(क्रमशः)**




# इष्टनिष्ठा, दृढता व आत्मविश्रांतीने सफलता

हनुमंत प्रभू श्रीरामांच्या आज्ञेने दूत बनून सीता मातेकडे लंकेत जात होते. मार्गात देवता, गंधर्व वगैरेंनी त्यांचे सामर्थ्य, पराक्रम व सेवानिष्ठेची परीक्षा घेण्यासाठी नागमाता सुरसा हिला प्रेरित केले. तेव्हा सुरसाने विक्राळ राक्षसीचे रूप घेतले आणि समुद्र ओलांडून जाणाऱ्या हनुमंतांना अडवून अट्टहास करू लागली : ''हाऽऽऽ... हाऽऽऽ... हाऽऽऽ... कपिश्रेष्ठ ! आज विधात्याने तुलाच माझे भक्ष बनविले आहे, मी तुला सोडणार नाही. तू लगेच माझ्या तोंडात ये.'' असे बोलून तिने आपले भयंकर तोंड उघडले.

एका खऱ्या सेवकासाठी स्वामीच्या सेवेहून, त्यांच्या आज्ञेहून श्रेष्ठ दुसरे काहीच नसते. **'राम काजु कीन्हें बिनु मोहि कहाँ बिश्राम ।'** अशी निष्ठा असणारे हनुमंत विनम्रतेने सुरसाला म्हणाले : ''देवी ! मी श्रीरामांच्या आज्ञेने लंकेत जात आहे. सीतामातेचे दर्शन करून जेव्हा श्रीरामांना भेटेन, तेव्हा तुझ्या मुखात येईन. हे तुला सत्य वचन देतो.''

सुरसा हसू लागली : ''नाही अंजनीसुत ! मला विधात्याने वरदान दिले आहे की 'कोणीही तुझे उल्लंघन करून पुढे जाऊ शकणार नाही.' तुला माझ्या मुखात प्रवेश करूनच पुढे जावे लागेल.''

एकीकडे मृत्यू तर दुसरीकडे स्वामीची आज्ञा होती. अशा बिकट परिस्थितीतही हनुमंत विचलित झाले नाही. उलट आपल्या अंतर्यामी रामात शांत झाले. लगेच अंतर्प्रेरणा मिळाली आणि ते सुरसाला म्हणाले : ''तर ठीक आहे, तू तुझे मुख इतके विशाल कर की मला सामावून घेऊ शकशील.''

सुरसाने आपले मुख १ योजन (८ मैल किंवा सुमारे १३ कि.मी.) इतके मोठे बनविले तेव्हा हनुमंत १० योजन इतके मोठे झाले. हे पाहून सुरसाने आपले मुख २० योजन इतके मोठे केले. तेव्हा हनुमंत ३० योजनाचे झाले. वाढता वाढता जेव्हा हनुमंत ९० योजन शरीराचे झाले तेव्हा सुरसाने मुखाचा आकार १०० योजन बनविला, जो एका भयंकर नरकासमान दिसत होता.

तेव्हा बुद्धिमान वायुपुत्राने चटकन आपले शरीर अंगठ्याएवढे बनविले आणि तीव्र वेगाने सुरसाच्या मुखात प्रवेश करून बाहेर निघून आले. ते सुरसाला म्हणाले : ''नागमाता ! मी तुझ्या मुखात प्रवेश करून आलो आहे, यामुळे तुझे वरदानही खरे ठरले. आता मी श्रीरामांच्या सेवेसाठी जात आहे.''

हनुमंतांची स्वामीनिष्ठा व सेवेतील तत्परता पाहून सुरसाने आपल्या खऱ्या रूपात प्रगट होऊन त्यांना सेवेत शीघ्र सफलतेचा आशीर्वाद दिला. हनुमंतांची आपल्या इष्टदेवाच्या सेवेतील निष्ठा व बुद्धिचातुर्य पाहून सर्व देवता, गंधर्व त्यांची स्तुती करू लागले.

अशा प्रकारे सर्वप्रथम तर आपण आपल्या जीवनात उच्च ध्येय बाळगावे, जसे हनुमंतांनी ध्येय बाळगले - आपल्या इष्टदेवाच्या, आपल्या आध्यात्मिक मार्गदर्शकाच्या निष्काम सेवेचे. दुसरे, आपण आपल्या त्या सत्संकल्पाप्रती, आपल्या त्या उच्च ध्येयाप्रती इतके दृढ व्हावे की आपल्या जीवनात हनुमंतांसारखी दृढता, निष्ठा सर्वप्रकारे प्रगट व्हावी की 'प्राणिमात्राचे परम हितैषी माझ्या सर्वेश्वराचे दैवी कार्य केल्याविना मला विश्रांती कुठे ?' आणि तिसरी गोष्ट, कार्य करताना अधूनमधून आणि जेव्हा बिकट परिस्थिती येतील तेव्हा आपल्या हृदयातील सत्ता-स्फूर्ती ⟹




# दुःखाला उत्सव बनविण्याची कला

– पूज्य बापूजी

आपण दुःख इच्छित नाही, दुःख भगवंताने बनविले नाही आणि दुःख आपल्याला आवडत नाही तरीही दुःख का होते ? कारण ईश्वरीय रहस्य, ईश्वरीय लीला, ईश्वरीय ज्ञानाला आपण जाणत नाही. आपल्या मनाच्या कल्पनांनी आपण दुःख बनवितो, सुख बनवितो. खरे पाहता जेथे अनुकूलता होते, त्याला आपण सुख म्हणतो आणि जेथे प्रतिकूलता होते, त्याला आपण दुःख म्हणतो.

शास्त्र म्हणतात : **अनुकूलवेदनीयं सुखं प्रतिकूलवेदनीयं दुःखम् ।** ...तर ही अनुकूलता व प्रतिकूलता विधायकाचे विधान आहे, त्या विधात्याचे विधान आहे. अनुकूलता देऊन तो आपल्याला उदार बनवितो जेणेकरून आपण सन्मार्गावर चालावे आणि प्रतिकूलता देऊन तो आपली आसक्ती मिटवितो. विधान जे असते ना, ते कल्याणासाठीच असते. आपल्याला जे चांगले वाटत नाही तेसुद्धा होते तेव्हा समजावे विधान कल्याणकारी आहे आणि जे आपल्याला चांगले वाटते ते आपल्याकडून हिरावून घेतले जाते तेव्हा समजावे की विधात्याची कृपा आहे. परंतु आपण काय करतो की जे चांगले वाटते ते जेव्हा हिरावून घेतले जाते तेव्हा दुःखाकार वृत्ती बनवितो आणि 'मी दुःखी आहे' असा मूर्खपणा आपल्यात भरतो. परंतु असे कोणतेही दुःख आणि विघ्नबाधा नाही की ज्यात आपले कल्याण दडलेले नसेल. म्हणून कधीही दुःख आणि विघ्नबाधा आल्यावर समजावे की हे विधायकाचे विधान आहे. आपले कल्याण करण्यासाठी आले आहे, आसक्ती सोडविण्यासाठी आले आहे, संसाराची मोह-ममता सोडविण्यासाठी आले आहे. वाऽऽ प्रभू, वाऽऽ ! तुझा जयजयकार असो !

दुःखाला तुम्ही भजनात बदलवू शकता, दुःखाला तुम्ही ज्ञानात बदलवू शकता, दुःखाला तुम्ही विवेकात बदलवू शकता, दुःखाला दुःखहारी परमात्म्यात बदलवू शकता. दुःख तुमच्यासाठी भगवद्प्राप्तीचे साधन होईल. जर सुख आले आणि त्याचे भोगी बनलात तर सुख तुम्हाला खिळखिळे बनवेल. सुख आले आणि जे त्याचे भोगी बनले आहे ते नरकांमध्ये पडले आहेत, रुग्ण बनले आहेत.

...तर तुम्हाला लवकरात लवकर दुःखांतून पार व्हायचे असेल तर सुखाची लालसा सोडून द्या. सुखाची लालसा सोडताच तुमचा तुमच्या अंतरात्म्याशी जो संबंध आहे, तो प्रगट होईल. जसे पाण्यावरील शेवाळ दूर सारल्याने पाणी दिसते, अगदी असेच सुखाची लालसा दूर केल्याने सुखाचा, मधुमय आनंदाचा सागर हेलकावू लागतो. दुःखाच्या भीतीने तुम्ही भयभीत होऊ नका. दुःख आले तरी उत्सव साजरा करा : 'वाऽऽ ! आले, वाहवाऽऽ ! बरे झाले, चांगले आहे. हे दुःख आणि कष्ट आसक्ती मिटवून हरीत प्रीती जागृत करणारे आहे, वाऽऽ भाऊ ! वाऽऽ !!' ...तर बाहेरून दुःख दिसेल परंतु तुमच्या ईश्वरीय संबंधाच्या स्मरणाने दुःखही स्वप्न होईल, सुखही स्वप्न होईल, आनंदस्वरूप परमात्मा आपला होईल. ❐

---

व सामर्थ्याच्या केंद्ररूपात सदैव विराजमान त्या अंतर्यामीत थोडे शांत व्हा, निःसंकल्प व्हा. यामुळे दैवी कार्य उत्तमरित्या पार पाडण्याची सुंदर समज व सत्प्रेरणा तुम्हाला मिळेल. सर्वांनी तुमची प्रशंसा जरी केली तरी तुम्हाला तुमच्या देहाप्रती नव्हे, तर अंतर्यामीत आत्मीयता, निष्ठा व सतर्कता सुदृढ झाल्याने तुम्ही आपल्या उच्च ध्येयापासून च्युत होऊ शकणार नाही आणि केवळ त्या दैवी कार्यालाच नव्हे, तर आपल्या जीवनालाही परम सफल बनवाल. ❐




# बापरे बाप ! कशी दुःखदायी आहे ममता !

- पूज्य बापूजी

**तुलसी ममता राम सों, समता सब संसार ।**

ममता जर करायची असेल तर अंतर्यामी प्रभूशी करा. 'मुलाचे काय होईल, मुलीचे काय होईल, दुकानाचे काय होईल, अमुकचे काय होईल, तमुकचे काय होईल ?' असा विचार करीत राहणारे लोक दुःखी होऊन मरून जातात. मग ते कुठे जातील, कोणत्या योनीत भटकतील काही ठाऊक नाही. कोणताही बुद्धिमान मनुष्य अशी लाचारी इच्छित नाही. जसे घरातून निघण्यापूर्वीच बुद्धिमान मनुष्य हा विचार करतो की कुठे जायचे आहे, काय खायचे आहे, कुठे रहायचे आहे ?... असेच जीवनाची सायंकाळ होण्यापूर्वीच तो विचार करतो की 'मेल्यावर आपले काय होईल ?'

एक वयोवृद्ध दांपत्य होते. त्यांच्या सुनेला दोन मुले होती- एक मुलगा, एक मुलगी. आजोबा-आजीला आपल्या नातवंडांचा फार लळा होता. मृत्यूनंतर ते दोघे कुत्रा-कुत्री बनले आणि जेव्हा नातवंड बाहेर शौचास बसत तेव्हा ते दोघे त्यांच्यावर लक्ष ठेवत. कोणी वाटसरू आला किंवा दुसरा कुत्रा तेथून जाऊ लागला तर कुत्री मोठमोठ्याने भुंकत असे. एके दिवशी सुनेला खूप राग आला नि म्हणाली 'ही कुत्री रोजच मोठ्याने भुंकते.' तिने काठी उचलून मारली तर कुत्रीचे कंबरडे मोडले. दोन्ही पाय फरफटत ती लंगडत चालू लागली. आता तिचे भुंकणे कमी झाले.

दैवयोग म्हणा, सर्वसमर्थ ईश्वराची लीला म्हणा, त्या कुत्र्याला व कुत्रीला पूर्वजन्मीची स्मृती आली. कुत्रा म्हणाला : ''कुलटे ! या मुलांच्या, नातवंडांच्या ममतेनेच तर कुत्रा-कुत्री बनविले. तू भुंकत होतीस आणि मलाही भुंकायला लावत होतीस. तुझ्या भुंकण्याचे फळ बघ ! कोण तुझा आहे ? ज्या सुनेला 'लाडकी-लाडकी' म्हणून लाड करीत होतीस, जिच्या मुलांना दूध पाजत होतीस, तिनेच त्या मुलांपायी तुझे कंबरडे मोडले. जर हीच ममता भगवंतावर केली असती तर तुझी-माझी अशी दुर्गती झाली नसती. आता शांत बस.''

नंतर सून आणि मुलाला एका संतश्रींकडून समजले की 'हेच तुमचे आई-वडील होते ! आता कुत्रा-कुत्री होऊन आले आहेत. मुले शौचाला बसतात तेव्हा ते त्यांची राखण करतात.'

हे भगवंता ! बापरे बाप ! कशी दुःखदायी आहे ममता ! भगवंतावर ममता केली नाही तर पुत्र-पौत्र, घरदार वगैरे जेथे कुठे ममता असेल तेथे पुन्हा यावे लागेल. देव करो की भगवंतच तुम्हाला आवडावे, भगवंतच तुम्हाला तुमचे वाटावे. भगवंत करो की भगवंतातच तुमचे मन लागावे. तुम्ही भगवंताच्या नात्याने तत्परतेने काम करावे. जसे पत्नी पतीच्या नात्याने सासूची, सासऱ्याची, जाऊबाईची, नणंदेची, पाहुण्यांची सेवा करते, अगदी असेच भगवंताच्या नात्याने सर्वांशी व्यवहार करावा, ममतेच्या नात्याने नाही. 'भविष्यात हा कामी येईल, माझे हा कल्याण करेल, मला हे देईल...' नाही, ईश्वराच्या नात्याने कर्म करा.

नर-नारीच्या रूपात, पक्ष्यांच्या रूपात, पशूंच्या रूपात सर्वत्र चेतना त्या परमेश्वराचीच आहे. हे हरी ! हे नारायण ! हे प्रभू ! बस, भगवंताचे ज्ञान, भगवद्स्मरण आणि भगवंताची प्रीती. जर प्रेम करायचे असेल तर त्याच्यावरच करा, प्रार्थना करायची असेल तर त्यालाच करा, ममता करायची असेल तर त्याच्यातच करा. भांडण करायचे असेल तरीही त्याच्याशीच करा. कारण त्याच्यासारखा खरा मित्र आणि संबंधी दुसरा कोणीही नाही. ❑




# कौटुंबिक भांडणतंट्यांना प्रेमात कसे बदलावे ?

- पूज्य बापूजी

'ही सून तर अशी आहे... काय करू, आजकालच्या तर परक्या मुली आल्या, काळच बिघडला आहे. ती अशी आहे, अमुक तशी आहे...' अगं ! तूसुद्धा तर परकी कन्या आहेस. आत्ता आजीबाई बनून बसली आहेस. तू या घरची मुलगी आहेस का ? तर सासुमातांनो ! सुनेची निंदा करू नका आणि सुनांनो ! सासूने थोडेफार ऐकवले तरी तुम्ही तर कधीही सासूची निंदा करू नका. जर तुमची पत्नी आणि आई म्हणजे सासू-सून, थोरली जाऊ-धाकटी जाऊ, नणंद-वहिनी आपसात भांडत असतील तेव्हा काय केले पाहिजे ?

पत्नीला एकांतात समजाविले पाहिजे की 'तू माझ्या आईची तक्रार करतेस, 'आई अशी आहे, तशी आहे...' तुझ्या सर्व गोष्टी मी जर खऱ्याही मानल्या तरी मी तर तिचे दूध प्यायलो आहे, मी तिच्या पोटात राहिलो आहे, आईची निंदा ऐकल्याने माझे पुण्य व मती मंद होईल, माझा प्रभाव नष्ट होईल आणि पुण्यहीन, मंदबुद्धी, प्रभावहीन पतीकडून तू कसे मूल घेऊन सुखी होशील ? इतके तर समजून घे ! भोळी आहेस तू. म्हणून आईविरुद्ध मला काही बोलली नाहीस तर बरे होईल. मी तर म्हणतो की वडीलधाऱ्यांचे, आईचे मन जिंकणे हा तुझ्या डाव्या हातचा खेळ आहे, तू ते करू शकतेस.' तिला रागावू नका, विश्वासात घ्या. ती अजून आई बनली नसेल तर तिला सांगा : 'आईची सेवा करशील तर तुझी मुलेही ओजस्वी-तेजस्वी होतील, तूसुद्धा पुण्यात्मा लाची आई होशील.' किंवा आई बनली आहे तर गुड्डूची आई, लल्लाची आई...' जी कोणी असेल, तला प्रेमाने समजावून सांगा. २-५ वेळा असा यत्न कराल तर तुमचे अंतःकरण पवित्र होईल आणि पत्नीच्या हृदयात सासूप्रती जी गाठ बांधली ली आहे ती सुटेल. पत्नीला युक्ती द्या की 'आई कती वर्षांची पाहुणी आहे ! तुला तर माझ्यासोबत सपूर्ण आयुष्य काढायचे आहे, मलाही तुझ्यासोबत आयुष्य काढायचे आहे.' अशा प्रकारे विश्वासात घेऊन सासू-सुनेचे भांडण मिटविले पाहिजे.

थोरली व धाकटी जाऊ भांडण करीत असेल तर काय करावे ? घरी 'हे प्रभु ! आनंददाता !!...' या प्रार्थनेचा पाठ सुरू करा, दोघींचे भांडण स्नेहात बदलेल. थोरल्या जावेच्या पतीने समजवावे की 'बघ ! धाकटी जाऊ अशी आहे, तशी आहे...' असे तू म्हणतेस पण तो माझा लहान भाऊ आहे, मुलासारखा आहे तर त्याची पत्नी तुझ्या आणि माझ्या सुनेसारखी आहे. मूर्ख बनू नकोस, उदार हृदय ठेव. मोठ्यांचे मोठेपण यातच असते की लहान्याला प्रेमाने वशीभूत करावे. लहान्यास रागावून, धमकावून किंवा त्याचे दुर्गुण पाहून नव्हे, तर त्याचे सद्गुण पाहून, त्याचे कौतुक करून त्याला अनुकूल केले जाते.' मोठ्या भावाने आपल्या पत्नीला अशा प्रकारे समजवावे आणि लहान भावाने एकांतात आपल्या पत्नीला समजवावे की 'अगं ! काहीही असो, मोठा भाऊ वडिलांसमान असतो. वहिनी माझ्या आईसारखी आहे. तू थोडी उदारहृदयी बन ना ! मोठ्यांचे तर जराशा आदर-सत्कारानेच हृदय द्रवते, हे तू का समजून घेत नाही ? कशाला भोळी बनतेस ? 'जाऊबाई अशी आहे, तशी आहे' पण ती सर्वकाही सोडून आली आहे, तुझ्यासारखा त्यागही आहे तिच्यात. तूसुद्धा आपले माहेर सोडून इकडे आली, तीसुद्धा माहेर सोडून आली. दोघीही त्यागी-त्यागी आपसात भांडत आहात एकाच जातीच्या असून, किती आश्चर्याची गोष्ट आहे ! माझी परीक्षा घेत आहात का तुम्ही दोघी जावा-जावा ?' असे समजावून त्यांना राजी करा.

नणंद-वहिनीचे भांडण होत असेल तर पत्नीला समजवावे की 'हे बघ ! वर्ष-दोन वर्षांत ती बिचारी परक्या घरी जाईल, आत्ता तिचे मन दुखवून तिचे शिव्याशाप तू कशाला घेतेस ! तुलाही मुलगी झाल्यावर तिने असे दुःख दिले तर ! म्हणून माझी बहीण ही तुझ्या स्वतःच्या मुलीहूनही जास्त आदरणीय आहे. नणंदेप्रती वहिनीचे उदारहृदय असले पाहिजे, असे शास्त्र म्हणतात.' आणि 'हे प्रभु ! आनंददाता !!...' या प्रार्थनेचा घरबसल्या पाठ करा आणि शेजारील मुला-मुलींना बोलावूनही पाठ करा.

**संघर्षात, एकमेकांच्या निंदेत, एकमेकांच्या चुका शोधण्यात, एकमेकांवर दोषारोपण करण्यात आपल्या शक्तींचा जितका ऱ्हास होतो आणि योग्यता कुंठित होतात, तितकी शक्ती व योग्यता आपण जर १५ मिनिटे 'हरि ॐ...' चे गुंजन करण्यात लावली तर आपले दर्शन करणाऱ्याचेही कल्याण होईल, अशी योग्यता आपणा सर्वांमध्ये दडलेली आहे.** ❐

(पृष्ठ ११ वरून 'ध्रुव आणि भगवान विष्णूंचा...' चा शेष)

''यातून बाहेर पडण्याचा उपाय हाच आहे की स्वतःसहित आणि अटळ पदासहित संपूर्ण जगाला सर्वव्यापक गोविंद समज आणि पश्चात्ताप करू नकोस. **हे ध्रुव ! जोपर्यंत निद्रा दूर होत नाही तोपर्यंत स्वप्नातील मनुष्याला स्वप्नातील ठिकाणी कुठे ना कुठे प्रवास करावाच लागेल आणि स्वप्नातील ठिकाणांसाठी बुद्धिमानांना श्रेष्ठ-कनिष्ठ असा भाव नसतो. हे ध्रुव ! 'सर्व शरीरांसहित स्वप्न-जगत मिथ्या आहे आणि स्वप्नद्रष्टाच सत्य आहे.' हे जाणणेच भवरूपी अंधकुपातून बाहेर पडणे आहे.''**

''काही चिंता नाही. जेव्हा सर्वकाही गोविंद आहे तेव्हा पश्चात्तापही गोविंद आहे आणि पश्चात्ताप न करणेही गोविंद आहे.''

भगवान विष्णू म्हणाले : ''आता मी येतो. तुझे कल्याण होवो आणि तुला संतसंगती लाभो.''

श्रीविष्णू अंतर्धान पावले आणि ध्रुव एका वनात विचरण करू लागला.

**(आध्यात्मिक विष्णू पुराणातून क्रमशः)** ❐

# ओळखा पाहू

**आश्रमाद्वारे प्रकाशित 'योगासन' पुस्तकातून ५ आसनांचे चित्र आणि त्यांच्यापुढे त्यांचा एक-एक लाभ देत आहोत. शब्दकोड्यातून त्या आसनांची नावे शोधा. या आसनांचा दररोज नियमितपणे ३ ते ५ मिनिटे सराव केला पाहिजे.**



**(१) उत्साह वाढतो, बुद्धीचा अलौकिक विकास होतो.**



**(२) हृदयरोग व दमा होत नाही, स्वप्नदोष दूर होतो.**



**(३) जठराग्निवर्धक, थॉयराईडमध्ये लाभदायी, नेत्र व बुद्धी शक्तिवर्धक.**



**(४) डोकेदुखी व यकृताचे रोग बरे होतात, वृद्धावस्थेची लक्षणे लवकर येत नाहीत.**



**(५) पोटातील गॅस व मलावरोध दूर होतो.**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| म | मी | ष्ट | मा | न | ज | दः | दि | ल | अ | र्थी | ति |
| द | श्री | उ | न | प | न | डी | पः | स | श्री | तु | घ |
| र | श | दा | श्री | स | र | सं | न | स | रा | नु | ध |
| गी | ड | शः | ह्मा | र्वां | द्धा | कु | श्री | स | श्री | श | उ |
| अ | क्ष | प | रा | गा | सः | सि | म | वि | गा | णे | इ |
| रः | हा | त | व | स | ध | ली | तां | दी | भा | जं | चे |
| र | ह | ध | श्री | न | शः | न | स | डा | ता | व | भु |
| ती | क | ला | रु | नि | मु | श्री | डा | क | र्थ | गु | नः |
| न | श्री | ज | स | भ | वा | क्ता | मी | न | श्री | पा | ड |
| ज | स | ड | प | न | गु | सः | स | प | ल | ल | नः |
| ता | सः | क्रा | श्री | ग | ङ | त्या | ए | न | स | श्री | घ |
| गी | त | भ | च | र | म | मा | पि | र | बु | प | र |

**गतांकाच्या 'ओळखा पाहू' ची उत्तरे :**

(१) विष्णू (२) केशव (३) केशिनिषूदन (४) जगत्पती (५) देववर (६) भगवान (७) महाबाहू (८) यादव (९) हरी (१०) माधव

(पृष्ठ १० वरून **'पूज्य बापूजींना बदनाम करण्याचे सुनियोजित षड्यंत्र'** चा शेष)

**''तिला गुरुकुलात रहायचीच इच्छा नव्हती. तिला पिक्चर पाहणे, मुलांविषयी चर्चा करणे, फास्टफूड - यांच्यातच अधिक रुची होती. या कारणांमुळे मुलगी बिघडू नये म्हणून तिच्या वडिलांनी तिला जबरदस्तीने गुरुकुलात ठेवले होते.**

**गुरुकुलाचे सात्त्विक भोजन, नियम-जप वगैरे करून तेथील संयत वातावरणात राहणे तिच्यासाठी कठीण होते. ती चोरून-लपून पिक्चर पाहत असे. तिला गुरुकुलातून निघून जायचे होते. कसे निघता येईल याविषयी ती विचार करीत रहायची. ती मध्यरात्रीपर्यंत गुरुकुलाच्या गच्चीवर फिरत रहायची.''**

जाण्याच्या काही दिवसांपूर्वी ती म्हणत होती : **''मला माझे नाव करायचे आहे. मी या गुरुकुलास बदनाम करून टाकेन. बदनामी झाली तर आपोआपच बंद होईल. मग तर वडिलांना मला येथून घेऊन जावेच लागेल.''**

गुरुकुलास बदनाम करण्यासाठी तिने बापूजींना बदनाम करण्याचा मार्ग निवडला. ...आणि विश्वप्रसिद्ध संताला बदनाम करण्याचा सर्वांत सोपा मार्ग होता - 'चारित्र्यहनन'.

आरोप लावणाऱ्या मुलीच्या एका मैत्रिणीने सांगितले : **''मी तिला विचारले की तू बापूजींवर खोटा आरोप का लावला ? तेव्हा तिने सांगितले की मला जसे बोलायला सांगतात तसे मी बोलते.''**

आई-वडिलांसह मुलगी शाहजहापूरला गेली. काही दिवसांनी तिच्या भावाला पोलिसांद्वारे छिंदवाडा गुरुकुलातून परत बोलविण्यात आले. जाताना लिखित तसेच व्हिडिओ इंटरव्ह्यूत त्याने गुरुकुलाप्रती आपले सकारात्मक विचार मांडले. नंतर षड्यंत्रकाऱ्यांशी संगनमत केल्यावर त्याने बयान दिले की 'गुरुकुलात भोजन दिले जात नाही, उपाशी ठेवतात, फक्त मांस-मासे खाऊ घालतात.' हे साफ खोटे आहे आणि शक्यच नाही. हे अगदी खोटे आरोप लावण्यात आले, जे तेथील मीडियात आले. अशा प्रकारचे न जाणे कसे-कसे आरोप लावण्यात आले आणि मुलीद्वारेही कपोलकल्पित आरोप लावण्यात आले. षड्यंत्रकाऱ्यांनी त्या बहिण-भावाकडून असे खोटे वदवून घेतले. अशा बयानांवरूनच षड्यंत्रकाऱ्यांच्या षड्यंत्राचा गंध येतो.

## मेडिकल रिपोर्ट पूर्णतः नॉर्मल

आरोप लावणाऱ्या मुलीच्या मेडिकल टेस्ट रिपोर्टमध्ये लिहिले आहे की तिच्या शरीरावर कोठेही ओरखडे, बाईट (दातांनी चावण्याच्या खुणा) नाहीत. तिच्याशी कोणतेही लैंगिक शोषण (सेक्शुअल ॲसॉल्ट) तसेच शारीरिक शोषण (फिजिकल ॲसॉल्ट) झालेले नाही. मेडिकल रिपोर्ट पूर्णतः नॉर्मल असूनही बलात्कारासाठी लावले जाणारे गैर जामीन कलम ३७६ अजूनही लागले आहे. मुलीनेही आपल्या बयानात कोठेही 'रेप झाला' असे म्हटले नाही.

## कशी कपोलकल्पित कहाणी !

मुलगी सांगते : 'बापूजींनी मला खोलीत बोलावले, माझी आई खोलीबाहेर बसली होती. बापूजी दार बंद करून माझे कपडे काढू लागले तेव्हा मी ओरडू लागले, तर माझे तोंड बंद केले. दीड तास माझ्या शरीरावर हात फिरवित राहिले. नंतर मला म्हटले : 'आई-वडिलांना सांगू नको. नाहीतर ठार मारेन.'

दीड तासांनी मी खोलीतून बाहेर आले तेव्हा घाबरलेली होते. आईसोबत कुटियेच्या कंपाऊंडबाहेरच जे साधकाचे घर आहे, तेथे निघून गेले. मी माझ्या आई-वडिलांना काहीच सांगितले नाही आणि झोपी गेले.'

कशा कपोलकल्पित गोष्टी आहेत ! जी मुलगी आजारी आहे, उपचार झाला, मानसिक विक्षिप्त आहे, तिला छिंदवाड्याहून शाहजहापूर

व तेथून जोधपूरला (२००० कि.मी. हूनही अधिक दूर) आई-वडिलांसह बोलावून आणले आणि आई खोलीबाहेर बसली असेल तेव्हा कोणी सामान्य किंवा मूर्ख माणूसही मुलीचे तोंड दाबून दीड तास शरीरावर हात फिरवित राहील, कुचेष्टा करीत राहील आणि जवळच शेतकऱ्याचे घर आहे, आई-वडीलही आहेत - असे कधी शक्य नाही. आई कुटियेच्या दाराबाहेर बसली असेल तर तिला मुलीच्या ओरडण्याचा आवाज का ऐकू गेला नाही ? दीड तास जिचे लैंगिक शोषण झाले असेल, अशी तथाकथित १६-१७ वर्षाची मुलगी जेव्हा आईच्या समोर जाते तेव्हा काय आईला मुलीची दशा पाहून मनात शंका आली नसेल ? ...आणि शोषण दीड तासपर्यंत झाले, हे मुलीला अशा परिस्थितीत कसे कळले ? काय ती घड्याळ पाहून आत गेली होती आणि बाहेर आल्यावरही घड्याळ पाहिले होते ?

मुलगी बयानात लिहिते की 'मी गुपचूप खोलीत जाऊन आई-वडिलांसोबत झोपी गेले.' असे झाल्यावर कोणी कसे झोपू शकतो ? मग सकाळी शेतकऱ्याच्या मुलांसोबत खेळली आणि २०० रुपयेसुद्धा देऊन गेली. कारने स्टेशनवर गेली. दीड तास जर तिचे तोंड दाबले गेले, हात फिरत राहिला, ती विरोध करीत राहिली तर काय तिच्या शरीरावर कोठेही एखादे निशाण राहिले नसते ? दीड तास दाबलेले तोंड पाहून तिच्या आईच्या मनात शंका आली नसती ?

खोली बंद होती. कडी लावली होती. लाईटही बंद होती. अशा स्थितीत दीड तास मुलगी आत राहिली तर तेथेच बाहेर बसलेल्या आईने दार का नाही ठोठावले ? अथवा बाहेर जी तथाकथित ३ मुले उभी होती, त्यांना का नाही विचारले ?

त्या मुलीच्या कपोलकल्पित गोष्टींशिवाय पोलिसांकडे घटनेविषयी आणखी कोणती माहिती आहे ? तिच्या आरोपांच्या पुष्टीसाठी कोणते प्रूफ (पुरावे) आहेत ? मेडिकल रिपोर्ट तर नॉर्मलच आहे. घटना तर सांगते की १५ ऑगस्टची आणि एफआयआर नोंदविला २० तारखेला. असे का ? मुलगी उत्तर प्रदेशची, शिकत होती छिंदवाडा (म.प्र.) मध्ये, तथाकथित घटना जोधपूर (राजस्थान) ची सांगत आहे आणि मग एफआयआर दिल्लीत रात्री २-४५ वाजता का ? तोसुद्धा कमला मार्केट पोलीस ठाण्यातच का ? जर ते उत्तर प्रदेशातून ट्रेन, बस किंवा विमानाने जरी दिल्लीला गेले तरीही कमला मार्केट येण्यापूर्वी ३ मुख्य पोलीस ठाणे मेन रोडवर पडतात. तेथे का नाही नोंदविला एफआयआर ? त्यांच्या प्रत्येक चालीवर कित्येक प्रश्नचिन्ह उठतात.

जे भारतीय संस्कृतीचा प्रचार-प्रसार, समाजाची व्यापक सेवा, बालक, तरुण व महिलांचे उत्थान, रोगग्रस्तांचा उपचार, गोरगरिबांसाठी भंडारे, प्रत्येक प्रकारच्या नैसर्गिक आपदांमध्ये मदतकार्य इ. मध्ये ५० वर्षांपासून रत आहेत, अशा एका अत्यंत लोकलाडक्या महान संताला एका तथाकथित १६-१७ वर्षाच्या मुलीच्या आधारहीन, एकही सबळ पुरावा नसलेल्या आरोपांच्या आधारे काय पोलीस तुरुंगात पाठवू शकते ? ...तर या सर्वांमागे काय राजकारण आहे ? हिंदू धर्माची पाळेमुळे कापून टाकणे आहे ? लोकांची धर्मावरून श्रद्धा हटवून त्यांना धर्मांतरणासाठी प्रेरित करणे आहे ? भारत देश भारत तोपर्यंतच आहे जोपर्यंत हिंदू धर्म आहे. काय ते धर्म मिटवून भारत देशालाच मिटवू पाहत आहेत ? कित्येक प्रश्नचिन्ह उठतात. प्रबुद्ध समाजाने या गोष्टीकडे गंभीरतेने लक्ष दिले पाहिजे. कपोलकल्पित बातम्या पसरवून टीआरपी वाढविणाऱ्या मीडियावर अंकुश लावणारे ठोस कायदे भारतीय घटनेत असले पाहिजे. नाहीतर समाज दिग्भ्रमित होईल, धर्म आणि संतांवरील विश्वास गमावून बसेल. ...आणि हे केवळ हिंदू संतांवरच आरोप का लावतात ? संस्कृती आणि धर्मावरून आपली आस्था हटली तर सर्वनाश !

**यतो धर्मः ततो जयः ।**
**यतो धर्मः ततो अभ्युदयः ।**

जर संतच राहिले नाहीत तर जीवन दिशाहीन होईल.

**संत न होते जगत में, तो जल मरता संसार ।**

ब्रह्मज्ञानी महापुरुष अपार कष्ट, निंदा, अपमान सहन करूनही लोक-कल्याणाच्या कार्यात संलग्न राहतात. तो तर त्यांचा स्वभावच असतो.

**तरुवर सरोवर संतजन चौथा बरसे मेह ।**
**परमारथ के कारणे चारों धरिया देह ॥**

## बापूजींच्या साधकांवरही झाला घोर अत्याचार

देश-विदेशांतील साधकांमध्ये या षड्यंत्राच्या विरुद्ध भयंकर असंतोष पसरला आहे. संपूर्ण देशात शांतिपूर्वक विरोध करीत रॅली, धरणे-प्रदर्शन सुरू झाले आहेत.

पूज्य बापूजींच्या ३ साधकांवरही खोटा आरोप लावण्यात आला. त्यांपैकी शिवा नामक एका साधकाशी पोलिसांनी चौकशीच्या नावाखाली दहशतवाद्यासारखा व्यवहार केला. आरोप लावणाऱ्या मुलीने सांगितले की १५ ऑगस्टच्या रात्री त्या सर्वांना शिवाभाईने बोलावून नेले होते. याउलट शिवाच्या तिकिटावरून तसेच मोबाईल लोकेशनवरून कळले की तो सायंकाळीच दिल्लीला निघून गेला होता. शिवाकडून पोलिसांनी रिमांडच्या बळावर कोऱ्या कागदावर हस्ताक्षर करवून घेतले. असे करविण्यासाठी पोलिसांवर किती प्रभाव-दबाव राहिला असेल ! शिवाला निर्दयतेने मारहाण करण्यात आली, प्रलोभन देण्यात आले, कानाचा पडदासुद्धा खऱाब करण्यात आला. बापूजींच्या विरुद्ध बयान घेण्यासाठी काय हा षड्यंत्रकाऱ्यांचा पोलिसांवर दबाव नाही ? हाताच्या कोपरांवर, गुडघ्यांवर जोड्यांनी मारले गेले. म्हणतात की 'हे सर्व मेडिकल टेस्टमध्ये येणार नाही.' असे बोलून शारीरिक व मानसिक पीडासुद्धा देतात. देव करो की अशी पीडा कोणा निर्दोषाला मिळू नये, जशी शिवाला देण्यात आली. पूज्य बापूजींवरही असा दबाव टाकण्यात आला. कोणताही कागद वाचून न दाखविताच त्याच्यावर हस्ताक्षर करविण्यात आले.

जेव्हा 'सहारा समय' व 'पी-7' न्यूझ चॅनलवाल्यांनी विचारले तेव्हा शिवाने संपूर्ण हकिगत सांगितली : ''बापूजी कधीही कोणत्याही मुलीशी एकांतात भेटत नाहीत. मी ८ वर्षांपासून गुरुदेवांच्या सोबत राहतो, पण आजपर्यंत असे काहीच घडले नाही. कुठे ना कुठे ही षड्यंत्रकाऱ्यांची सेटिंग आहे. माझ्याकडे असा कोणताही पुरावा नाही, कोणतीही सीडी नाही जसे मीडियाद्वारे पसरविण्यात आले आहे. माझ्यासोबत पोलीस जबरदस्ती करीत आहेत. पोलिसांनी माझी शेंडी खेचून उपटून टाकली, मला बेदम मारले, धाकधमकी दिली की आम्ही जे सांगतो तेच तुला बोलायचे आहे. 'माझ्याकडून पोलिसांना सीडी मिळाली आहे' असे कागदावर लिहून स्वाक्षरी करून कबूल कर असेही सांगितले. खरे पाहता माझ्याकडे कोणतीही सीडी नाही.'' शिवाने न्यायालयातही या गोष्टीची तक्रार केली.

या गोष्टीची पुष्टी करताना तसेच मीडियात दाखविल्या जाणाऱ्या खोट्या बातम्यांचे पितळ उघडे पाडताना डीसीपी अजय पाल लांबा यांनी प्रेस कांफ्रेंसमध्ये सांगितले : ''आम्हाला कोठेही कोणतीही सीडी, मुव्ही किंवा व्हिडिओ क्लिप मिळाली नाही. या सर्व गोष्टी तथ्यहीन आहेत.''

कोणत्याही व्यक्तीला पोलीस कस्टडीत घेतल्यानंतर २४ तासांच्या आत मॅजिस्ट्रेटपुढे तिला हजर करणे कायद्याच्या दृष्टीने अनिवार्य आहे. तरीही बेकायदेशीर रित्या जोधपूर पोलिसांनी ३ दिवस शिवाचा रिमांड घेतल्यावर शिवाला कोर्टात हजर केले.

छिंदवाडा गुरुकुलाची वार्डन शिल्पीचा गेल्या ६ महिन्यांपासून पूज्य बापूजींशी मौखिक किंवा

फोनद्वारे कोणताही संपर्क झाला नव्हता. जोधपूर पोलिसांनी छिंदवाड्याला जाऊन तिच्यावरही दबाव टाकला. सोबतच आरोप लावणाऱ्या मुलीच्या मैत्रिणींनाही बहकविले व धमकावले तसेच त्यांनाही तशाच प्रकारचे बयान देण्यासाठी बाध्य केले. जी चौकशी काही तासांतच पूर्ण होऊ शकत होती, ती ३ दिवसांपर्यंत सुरू ठेवण्याचे कुत्सित प्रयत्न करण्यात आले. या सर्व गोष्टींनी हैराण होऊन विद्यार्थिनींनी 'राजस्थान पोलीस असा दबाव का टाकत आहे ?' असा प्रश्न उठविला आणि त्यांच्याविरुद्ध नारे लावले, तेव्हा कोठे राजस्थान पोलीस छिंदवाड्यातून परत गेली.

काय हा षड्यंत्रकाऱ्यांचा दबाव, प्रलोभन अथवा जे काही म्हणा, स्पष्ट दिसत नाही ? यावरून हे स्पष्ट होते की भारतीय संस्कृतीला नष्टभ्रष्ट करण्याचे किती घोर षड्यंत्र होत आहे. नाहीतर देशाची सेवा करणारे असे महापुरुष व त्यांच्या साधकांशी दहशतवाद्यांसारखा व्यवहार केला नसता. हे घोर निंदनीय आहे. एका मुलीच्या निराधार गोष्टींच्या आधारे एका अशा संतावर, ज्यांची वाणी संपूर्ण जगातील करोडो लोक श्रद्धाने ऐकतात, ज्या महापुरुषाशी करोडो लोकांच्या धार्मिक भावना जुळलेल्या आहेत, त्यांच्यावर असा अत्याचार हा न्याय व कायदेव्यवस्थेचा दुरुपयोग नाही तर आणखी काय आहे ? ❒

## सीडी, डीव्हीडी सुद्धा उपलब्ध !

**पूज्य बापूजींच्या विरुद्ध होत असलेल्या षड्यंत्राची हकिगत जाणण्यासाठी पहा सप्टेंबर महिन्याची 'ऋषि दर्शन' डीव्हीडी. षड्यंत्राचे पितळ उघडे पाडणारी वेगळी सीडी सुद्धा उपलब्ध आहे. ही साधू-संत, मठ-मंदिर, सामाजिक संस्था व कार्यालयांपर्यंत पोहोचवा. समाजातील मुख्य व्यक्ती आणि जनमानसांपर्यंत पोहोचविण्याची सेवा करा. केबल चॅनल्सवर चालवा, सार्वजनिक ठिकाणी दाखवा आणि सत्याचा प्रचार करा.**

## 'संत सताये तीनों जायें, तेज बल और वंश'

**संत सताये तीनों जायें, तेज बल और वंश ।**
**ऐसे ऐसे कई गये, रावण कौरव और कंस ॥**

सूक्ष्म जगात संतांचा तळतळाट खूप काम करतो. ही शक्ती इलेक्ट्रॉनिक शक्तीहूनही अधिक काम करते.

द्वारका (गुज.) च्या स्वामी केशवानंदजी नामक संतश्रींवर असाच जुलूम झाला होता. त्यांना बलात्काराच्या खोट्या केसमध्ये फसविण्यात आले आणि १२ वर्षांची शिक्षा ठोठावण्यात आली. अधिकारी आपसात मिळाले होते. केशवानंदजींना मीडियाद्वारे इतके बदनाम करण्यात आले की कोणताही वकील त्यांच्या बाजूने केस लढायला तयार झाला नाही. शेवटी त्यांना तुरुंगात पाठविण्यात आले. परंतु ज्या अधिकाऱ्याने हे षड्यंत्र रचले होते त्याला गोधऱ्यात एका चित्त्याने मारून टाकले. दुसरा अधिकारी अशांतीच्या खाईत पडला, तिसऱ्या अधिकाऱ्यालाही बरेच भोगावे लागले... त्यांचा तर सर्वनाश झाला, परंतु केशवानंदजींना तर आजही तेथील लोक मानतात, त्यांचा आदर-सत्कार करतात. १२ वर्षांच्या शिक्षेपैकी ७ वर्ष त्यांनी तुरुंगवास भोगला आणि नंतर वास्तविकता बाहेर आली तेव्हा अपील केल्यावर त्यांना निर्दोष घोषित करण्यात आले.

हे सनातन संस्कृतीच्या सुपुत्रांनो ! अशा लोकांना अनीश्वरवादी म्हणा वा आपला अहंकार सिद्ध करण्यासाठी कोणत्याही पातळीला जाणारे तमस्-प्रधान प्रकृतीचे कूटनीतिज्ञ म्हणा, त्यांचा सामना करण्यासाठी आता आपणा सर्वांना तयार व्हावे लागेल. ॐ... ॐ... ॐ... जुलूम करणे तर पाप आहे, पण जुलूम सहन करणे दुप्पट पाप आहे. आता आपल्याला उद्यम करावा लागेल, आपल्या संस्कृतीच्या रक्षणासाठी व सेवेसाठी आपल्याला साहसी बनावे लागेल. धैर्यवान होऊन, मागचे-पुढचे गणित लावून आपल्याला पाऊल पुढे टाकावे लागेल. उद्यम, साहस, धैर्य, बुद्धी, शक्ती आणि पराक्रम - हे सहा सद्गुण तर आपल्या घरचा खजिना आहेत. आता तो खजिना उघडायचा आहे. ❒

# पर्व मांगल्य




## ते क्षण आत्मसाक्षात्काराचे...

– पूज्य बापूजी

**(पूज्य बापूजींचा आत्मसाक्षात्कार दिवस आश्विन शुक्ल पक्ष द्वितीयेनुसार ६ ऑक्टोबर २०१३)**

वर्षाची दुसरी नवरात्र... चाळीस दिवसांचे अनुष्ठान नर्मदेकाठी पूर्ण झाले. व्याकुळता वाढली, असे वाटत होते की जणू वारंवार इष्टदेव सांगत आहेत की 'तू लीलाशाहजींकडे जा, मी तेथेच भेटेन.'

मी अनुष्ठान करीत होतो तेव्हा अनुष्ठानाच्या माळा जोपर्यंत पूर्ण होत नाही तोपर्यंत झोपणे शक्यच नव्हते, असा माझा नियम होता. दिवसा माळा करता-करता कधी मध्येच कोणी आले तर माळा थांबविल्याने तो नियम पूर्ण करण्यात मला रात्रीचा एक-दीड वाजायचा. मग माळा पूर्ण करून झोपायचो, तारूण्य होते त्यामुळे झोप अशी यायची की पहाट केव्हा झाली कळतही नसे. सकाळी नदीकाठी चालायचो तेव्हा नर्मदेची वाळू माझ्या पायांत शिरत असे. कारण जंगलात जी माझी गुहा होती, त्यात चिचुंद्री फिरत असत. रात्री त्या माझी चामडी चाटता-चाटता कधी खाऊनही टाकायच्या. एका संतश्रींनी सांगितले की ''पायांना जे घाव झाले आहेत, ते चिचुंद्रींनी तुझ्या पायांना खाल्ले आहे.'' त्या दिवसांत दुसरे कशाचेच भान राहत नसे. ध्येय आपले त्या परम तत्त्वाचे, परम शांती मिळविण्याचे होते.

शिवमंदिरात गेल्यावर महादेवांवर पूजेसाठी वाहिलेली जी फुले आणि बेलपत्र असायची, ती आशीर्वादरूपात खाली पडत असत. कधी पार्वती मातेच्या मूर्तीवरून खाली पडत तर कधी गणपती आणि हनुमंतांच्या मूर्तीवरून. मंदिरात जाताच कधीकधी अशा घटना घडत असत. भक्त लोक सांगायचे की ईश्वराच्या प्रसन्नतेचे संकेत आहेत. परंतु हे सर्व होऊनही आत्मशांती, आत्मप्राप्ती तर नाही...

मी मनोमन विचारत असे की 'देवा ! तू केव्हा भेटशील ? कसा भेटशील ?' ...तेव्हा आतून आवाज यायचा : 'गुरुचरणी जा, लीलाशाहजींच्या चरणी जा. मी तेथेच सर्व रूपांमध्ये भेटेन.'

'...तर हे कोण बोलत आहे ?'

'ज्याचे तू अनुष्ठान करीत आहेस, तो बोलत आहे.'

'पण हे दोन्ही आवाज तर माझेच आहेत, कदाचित भ्रम तर नसेल ना ?'

'नाही-नाही, तू जा आणि मी भेटेन.'

पूज्य गुरुदेव नैनीतालहून मुंबईजवळील वज्रेश्वरीच्या एकांत जंगलात येऊन एका शांत ठिकाणी थांबले होते. तेथील पत्ता मला मिळाला. चाळीस दिवसांचे अनुष्ठान पूर्ण होताच तेथे पोहोचलो. सकाळचे साडे नऊ, पावणे दहा वाजले असतील. गुरुदेवांचे दर्शन झाले, डोळ्यांतून झरझर अश्रू वाहू लागले. गुरुदेवांनी माझ्या डोळ्यांत पाहून विचारले : ''कसा ? कुठून आलास ?'' कारण गुरुदेवांनी घरी पाठविले होते. मग मी घरून नर्मदेकाठी गेलो होतो. घरी राहणे माझ्या आवाक्यातील नव्हते. गुरुदेवांनी माझ्या डोळ्यांत निरखून पाहिले, ईश्वरप्राप्तीची व्याकुळता होती, डोळ्यांत प्रतीक्षा होती, हृदयेश्वराची जिज्ञासा होती. समजदारांचे शिरोमणी सद्‌गुरूंच्या चित्तातून हे पवित्र शब्द उच्चारले गेले : ''भगवंत सर्व चांगले करेल, कल्याण करेल.''

दुपारचे जेवण वगैरे झाले. जरा पाय लांब केले, थोडी वामकुक्षी केली, थोडा पहुडलो. एवढ्यात एक सेवक येऊन म्हणाला : ''साई बोलवित आहेत.'' दुपारचे पावणे दोन वाजले असतील. साई बसले होते. एक सेवक पंचदशीचे ७वे प्रकरण वाचत होता आणि गुरुदेवांनी इशारा केला की 'ऐक'. त्यात होते - **किमिच्छन् कस्य कामाय शरीरमनुसंज्वरेत् ।** मला पक्के लक्षात आहे. जेव्हा आपण शरीर नाही, आपण शाश्वत अमर आत्मा आहोत, सत्-चित्-आनंद आपला सहज स्वभाव आहे हे जाणले तेव्हा मग शरीरासाठी कशाची इच्छा करायची ? कोणत्या कामनेने बांधून संसाराच्या तापांना हा जीव झेलणार ? आपण अज्ञानाने शरीराला 'मी' मानतो, सांसारिक वस्तूंना 'माझ्या' मानतो. 'हे मिळाले तर सुखी होईन, हे मिळविले तर सुखी होईन...'

हे परिश्रम मला करावे लागले नाही, गुरुकृपेने विवेकाचा प्रकाश दिला. मिळवायचे आहे तर ते परब्रह्म पदच मिळवायचे आहे. **ज्ञात्वा देवं मुच्यते सर्वपाशेभ्यः ।** त्या आत्मदेवाला जाणल्याने मनुष्य सर्व बंधनांतून कायमचा मुक्त होतो. बस ! त्याची व्याकुळता, तत्परता होती. 'पंचदशी' वाचणारा वाचत होता, मी ऐकत होतो आणि गुरुदेव आपल्या गुरू स्वभावात, विश्रांतियोगात अशा प्रकारे बसले होते की आज्ञाकेंद्रावर गुरुदेवांचा हात होता. मी ऐकत होतो, गुरुदेवांचे दर्शनही करीत होतो.

**चातक मीन पतंग जब पिया बिन नहिं रह पाय ।**
**साध्य को पाये बिना साधक क्यों रह जाय ॥**

गुरुदेवांनी जरासा कृपाकटाक्ष टाकला आणि विचारले : ''समजत आहे ना ?'' मी विनम्रतेने हात जोडले. मग प्रकरणाचा सत्संग चालत राहिला.

ज्याच्यातून सगळे 'समज' (विवेक-विचार) उत्पन्न होऊन-होऊन लीन होतात, त्या परम समजस्वरूपात सदैव विचरण करणाऱ्या माझ्या शिवस्वरूप गुरुदेवांनी दुसरा कृपाकटाक्ष टाकला. बस, सर्व व्यापकता-व्यापकता, आनंद-आनंद, असीमता... वाणी तर काय बोलणार ! डोळे तर काय उघडणार !

**आसोज सुद दो दिवस, संवत् बीस इक्कीस ।**
**मध्याह्न ढाई बजे, मिला ईस से ईस ॥**
**देह सभी मिथ्या हुई, जगत हुआ निस्सार ।**
**हुआ आत्मा से तभी, अपना साक्षात्कार ॥**

स्थूल देह, सूक्ष्म देह, कारण देह हे प्रकृतीचे आहेत, यांच्यात परिवर्तन होते. कारण देहात निद्रा येते आणि जागरण होते. सूक्ष्म देहात विचार येतात, विकार येतात आणि निघून जातात. स्थूल देहातही बाल्यावस्था, तारुण्य, वार्धक्य येते आणि बदलून जाते तरीही जो बदलत नाही त्यात स्थिती करविणाऱ्या माझ्या लीलाशाहजी प्रभूंना कोटी-कोटी नमन, वंदन ! हा (साक्षात्कार) माझ्या आवाक्यातील नव्हता. मी प्रयत्न केला असता तर कर्ताभाव राहिला असता. काही अनुभूती मिळाल्या असत्या तर अहंकार वाढला असता आणि झाल्या नसत्या तर विफलतेच्या विषादात पडलो असतो. ना विषादात पडू दिले, ना अहंकारात गुरफटू दिले. हृदयातच हृदयेश्वराची भेट घालून देणाऱ्या सद्गुरू लीलाशाहजी प्रभूंना कितीही नमन केले तरी मी त्यांच्या कृपेची परतफेड करू शकणार नाही. तरीही काही दिवसांनी मी गुरुदेवांच्या चरणी गेलो. त्यांना प्रार्थना केली : ''तुम्ही जे दिले आहे त्याचे ऋण फेडण्यासाठी मला काहीतरी आज्ञा द्या, काही सेवा द्या.''

माझे प्रभू म्हणाले : ''सेवा करशील ?''


मी म्हणालो : ''हो.''

''बस, जे मिळाले आहे त्यात स्थित हो आणि इतरांनाही जागृत कर. स्वतः पी आणि इतरांनाही पाज.''

हा त्यांचाच संकल्प इतरांना पाजत आहे, मी काहीच करीत नाही. हा त्यांचाच प्रसाद आहे. वाद्यही त्यांचेच, गीतही त्यांचेच, निमित्त केवळ हे शरीर दिसते. वाद्य त्याचेच आहे ज्याला वाजविता येते, गीत त्याचेच आहे जो गाणे जाणतो. तेच गीत गात आहेत, तेच वाद्य वाजवित आहेत.

**हे गुरुकृपा ! तू सदैव माझ्या हृदयात निवास कर.**

शरीर स्वास्थ्य





# आरोग्य व पर्यावरण रक्षणाचा अमोघ उपाय : गायीचे तूप

देशी गायीचे तूप शारीरिक, मानसिक व बौद्धिक विकास तसेच रोगनिवारणाबरोबरच पर्यावरणाच्या शुद्धीचेही एक महत्त्वाचे साधन आहे.

याच्या सेवनाने -

(१) बळ, वीर्य व आयुष्य वाढते, पित्त शांत होते.

(२) स्त्री व पुरुषासंबंधी अनेक समस्यांचे निवारण होते.

(३) आम्लपित्त (ॲसिडिटी) व मलावरोध दूर होतो.

(४) एक ग्लास दुधात एक चमचा गायीचे तूप व खडीसाखर मिसळून प्यायल्याने शारीरिक, मानसिक व बौद्धिक दुर्बळता दूर होते.

(५) तारुण्यावस्था दीर्घकाळ टिकून राहते. काळ्या गायीच्या तुपाने वृद्ध मनुष्यही तरुणासमान होतो.

(६) गरोदर स्त्रीने तुपाचे सेवन केल्यास गर्भास्थ शिशू बलवान, पुष्ट आणि बुद्धिमान बनतो.

(७) गायीच्या तुपाचे सेवन हृदयाला मजबूत बनविते. हे कोलेस्ट्रॉल वाढवित नाही. रवीने दही घुसळून काढलेल्या लोण्यापासून बनविलेले तूप हृदयविकारांतही लाभदायी आहे.

(८) देशी गायीच्या तुपात कॅन्सरचा सामना करण्याची व त्यावर प्रतिबंध घालण्याची आश्चर्यकारक क्षमता आहे.

**दक्षता :** तुपाच्या अति सेवनाने अपचन होते. दररोज १० ते १५ ग्रॅम तुपाचे सेवन पुरेसे आहे.

**नाकात तुपाचे थेंब टाकल्याने –**

(१) मानसिक शांती व मेंदूला बळ मिळते.

(२) स्मरणशक्ती व नेत्रदृष्टी वाढते.

(३) अर्धशिशी (मायग्रेन) रोगात आराम मिळतो.

(४) नाकातील रुक्षता दूर होते.

(५) केस गळणे व पांढरे होणे बंद होऊन नवीन केस येऊ लागतात.

(६) सायंकाळी दोन्ही नाकपुड्यांत २-२ थेंब गायीचे तूप टाकल्याने तसेच रात्री नाभी व तळपायांना गायीचे तूप लावून झोपल्याने गाढ झोप लागते.

**प्रमाण :** ४ ते ८ थेंब.

## गोघृताने वातावरण शुद्धी व पावित्र्य

(१) अग्नीत गायीच्या तुपाची आहुती दिल्याने त्याचा धूर जेथपर्यंत जातो, तेथपर्यंतचे संपूर्ण वातावरण प्रदूषणरहित तसेच आण्विक विकिरणांनी मुक्त होते. केवळ १ चमचा गायीच्या तुपाची आहुती दिल्याने एक टन प्राणवायू (ऑक्सिजन) बनतो, जो इतर कोणत्याही उपायाने शक्य नाही.

(२) गोघृत आणि तांदूळ यांची आहुती दिल्याने कित्येक महत्त्वाचे वायू (उदा.- इथिलीन ऑक्साईड, प्रोपिलीन ऑक्साईड, फॉर्मल्डीहाईड इ.) उत्पन्न होतात.

इथिलीन ऑक्साईड वायू आजकाल सर्वाधिक वापरात येणारा जिवाणूरोधक वायू आहे, जो शल्यचिकित्सेपासून (ऑपरेशन) तर जीवनरक्षक औषधे बनविण्यापर्यंत उपयोगी आहे.

(३) मनुष्य-शरीरात शिरलेल्या रेडिओधर्मी विकिरणांचा दुष्परिणाम नष्ट करण्याची असीम क्षमता गायीच्या तुपात आहे. ❒

# संस्था समाचार

('ऋषी प्रसाद' प्रतिनिधी)

२५ ते ३१ जुलैपर्यंत निवाई (राज.) मध्ये पूज्य बापूजींचा निवास राहिला. त्यानंतर १ ऑगस्टला दुपारी बापूजींचे **लालसोट** येथे आगमन झाले. येथील भक्तांनी बनविलेल्या नव्या आश्रमाचे उद्घाटन संतश्रींच्या करकमलांद्वारे झाले.

१ ऑगस्टलाच रात्री पूज्य बापूजींचे जयपूर आश्रमात आगमन झाले. २ ऑगस्टला सर्वांचा आवडता बनण्याचे रहस्य सांगताना पूज्यश्री म्हणाले : ''तुम्ही कोठेही जाल तर आपल्या बुद्धीने, तनाने, मनाने, धनाने दुसऱ्यांची सेवा व्हावी, ज्ञान वाढावे, तब्येत चांगली रहावी. 'मी मोठी आहे, मी मोठा शेट आहे...' असा अभिमान करू नका आणि आपला व्यक्तिगत खर्च कमी करा. ...तर तो माणूस मोठा प्रभावशाली होईल, त्याची मागणी कायम राहील.'' यानंतर बापूजी पोहोचले पुष्करच्या **डुंगरिया** आश्रमात. येथे २ (सायं) ते ३ ऑगस्ट (सकाळ) पर्यंत पूज्यश्रींचा निवास राहिला.

३ (सायं) व ४ ऑगस्ट (सकाळी) **पाली** येथे पूज्य बापूजींनी सत्संग-वर्षा केली. ४ ऑगस्टला दुपारी **सुमेरपूर** येथे सत्संगाचे केवळ एकच सत्र दिले होते, परंतु भक्तांची प्रार्थना व आर्त हाकेने भक्तवत्सल गुरुदेवांनी ६ ऑगस्ट (सकाळ) पर्यंत तेथे थांबून सर्वांनाच सत्संग-अमृताने परितृप्त केले.

६ ऑगस्टला (दुपारी) सत्संग-गंगेचा प्रवाह पोहोचला **सिरोही** येथे. सिरोहीचे पूर्वीचे नाव शिवपुरी होते. तब्बल १८ वर्षांनी आपल्या लाडक्या बापूजींचे सान्निध्य मिळाल्याने येथील लोकांनी २४ तासांपेक्षाही कमी वेळात सत्संगाची पूर्ण व्यवस्था केली आणि सत्संग-पिपासूंनी मंडप खच्चून भरला.

७ ऑगस्टच्या सत्संगाचे ठिकाण होते कवी माघ यांची जन्मभूमी **भीनमाल**. भीनमालचे मूळ नाव होते 'श्रीमाल नगर' अर्थात् 'श्री' (लक्ष्मी) चे नगर. ८ ऑगस्टला **बाडमेर** ची जनता पूज्य बापूजींच्या पावन सान्निध्याने आनंदविभोर झाली.

९ ऑगस्टला (सायं) **बालोतरा** येथील सत्संगानंतर १० व ११ ऑगस्टला भक्तीचा गड **जोधपूर** येथे पूज्यश्रींनी भक्ती व ज्ञानाची सत्संग-गंगा प्रवाहित केली. या दरम्यान पूज्यश्रींचा निवास पालगाव (जोधपूर) आश्रमात होता. भक्तीच्या संस्कारांची शाश्वतता सांगताना बापूजी म्हणाले :

''भगवंताच्या मार्गावर चालता अथवा नियम-निष्ठेच्या मार्गावर चालता तेव्हा शरीर तर बदलून जाते परंतु तुमचे आत्मिक संस्कार तुमचे रक्षण करतात, कारण शरीर नश्वर आहे परंतु तुम्ही शाश्वत आहात. तर नियम-व्रत आणि परमात्म्याचे संस्कार तुमच्यावर पडतात.''

१२ ते १६ ऑगस्टला सकाळपर्यंत पूज्य बापूजींचा निवास मणई येथील एका शेतकऱ्याने बनविलेल्या कुटीत होता.

१६ (दुपार) व १७ ऑगस्टला दिल्लीच्या रजोकरी आश्रमात निवासानंतर १८ ते २० ऑगस्ट (सकाळ) पर्यंत रक्षाबंधन महोत्सव व पौर्णिमा दर्शन-सत्संग दिल्लीच्या **रामलीला** मैदानावर पार पडला. येथे पहिले २ दिवस मुसळधार पाऊस पडत असूनही श्रद्धाळूंची संख्या कमी झाली नाही.

२० (दुपार) व २१ ऑगस्टला रक्षाबंधन महोत्सव व पौर्णिमा दर्शन-सत्संग कार्यक्रमानिमित्त भक्तवत्सल पूज्य बापूजी पोहोचले **अहमदाबाद** आश्रमात. या दोन्ही ठिकाणी साधकांच्या वतीने ब्राह्मणाने वैदिक मंत्रोच्चाराद्वारे आणि भक्तांनी मानसिक रूपाने आपल्या गुरुदेवांना रक्षासूत्र बांधले.

पूज्य बापूजी २४ तारखेला सायंकाळी **इंदोर (म.प्र.)** आश्रमात पोहोचले. २५ ऑगस्टला सायंकाळी येथे सत्संग-कार्यक्रम झाला. २७ ऑगस्टला पूज्यश्री **सुरत** आश्रमात पोहोचले. २८ व २९ ऑगस्टला जन्माष्टमी महोत्सवात सत्संगासह दहीहांडीचा कार्यक्रम आणि विशाल संत-संमेलनही झाले. येथे संपूर्ण भारतातून आलेल्या संतांनी कुप्रचारकांना बजावून सांगितले की संपूर्ण संत-समाज पूज्य बापूजींच्या सोबत आहे आणि भ्रामक प्रचाराने संत-समाज व धर्मप्रेमी, देशप्रेमी जनतेला कोणत्याही प्रकारे भ्रमित केले जाऊ शकत नाही. **(वक्तव्य वाचा पृष्ठ ४ वर)**

# संतांवर अत्याचार अर्थात् संस्कृतीवर कुठाराघात




पूज्य संत श्री आशारामजी बापू




'धर्म रक्षा मंच' संकल्पसभेचे अध्यक्ष पूज्य बापूजी

''हा (चारित्रिक) आरोप साफ खोटा आहे, एक कट आहे. माझे सत्य माझ्या सोबत आहे. साँच को आँच नहीं, झूठ को पैर नहीं । भारतीय संस्कृतीविरुद्ध खूप मोठे षड्यंत्र सुरू आहे. म्हणून भारताच्या सर्वच हितैषींना संस्कृतीच्या रक्षणार्थ एकजूट व्हावे लागेल.''

- पूज्य संत श्री आशारामजी बापू





''पूज्य बापूजींवर जी चिखलफेक केली जात आहे, जे साफ खोटे आरोप लावले जात आहेत, ते पाहून, ऐकून प्रत्येक हिंदूचे मन दुखावले आहे.'' - श्री अभय वर्तक, राष्ट्रीय प्रवक्ता, 'सनातन संस्था'

''अखिल भारतीय संत समितीचे संत पूज्य बापूजींच्या सोबत आहेत.''


- 'अखिल भारतीय संत समिती' चे राष्ट्रीय महामंत्री महामंडलेश्वर श्री देवेंद्रानंद गिरी





''संपूर्ण देशाची प्रदक्षिणा करीत प्रत्येक माणसाच्या मनात सुसंस्कार रुजविणे, हे एक असे परम राष्ट्रीय कर्तव्य आहे, ज्याने आपल्या देशाला आजपर्यंत जिवंत ठेवले आहे आणि याच्या बळावर आपण उज्ज्वल भविष्याची स्वप्ने पाहत आहोत. पूज्य बापूजी संपूर्ण देशात विचरण करून जागृतीचा शंखनाद करीत आहेत, सर्वधर्मसमभावाची शिकवण देत आहेत, संस्कार देत आहेत. चांगले व वाईट यातील फरक ओळखायला शिकवत आहेत. मी बापूजींच्या चरणी सादर प्रणाम करतो.'' - श्री अटल बिहारी बाजपेयी, माजी पंतप्रधान

''संपूर्ण देशात एक प्रकारचे वातावरण तयार केले जात आहे. आपल्या संतांवर खोटे आरोप लावले जात आहेत. पूज्य संत आशारामजी बापूंचे वय ७३ वर्षे आहे, त्यांच्यावर बलात्काराचा आरोप लावून अटक करता ? ही अटक हिंदू समाजाला हे सांगण्यासाठी आहे की तुमच्या मनात संतांचा जो सन्मान आहे, निष्ठा आहे, श्रद्धेचा भाव आहे, तो आम्ही मिटवून टाकू.'' - वि.हिं.प. चे मुख्य संरक्षक व माजी आंतरराष्ट्रीय अध्यक्ष श्री अशोक सिंघल





''आज या जगातील बेईमानीचा, दुष्कृत्यांचा जर सर्वांत मोठा शत्रू कोणी असेल तर बापूजी आहेत. म्हणून त्यांच्यावर सर्वांत जास्त हल्ले (षड्यंत्र) होत आहेत.'' - 'सुदर्शन चॅनल' चे चेअरमन श्री सुरेश चव्हाणके

''संत आशारामजी बापू निर्दोष आहेत, संत त्यांच्या सोबत आहेत.''

- भाजप उपाध्यक्ष साध्वी उमा भारती



# पूज्य बापूजींवर लावलेले खोटे, कपोलकल्पित आरोप व त्यांच्या अटकेच्या विरोधात जाहिर विरोध-प्रदर्शन

RNP. NO. GAMC 1255/2012-14
(Issued by SSPOs Ahd, valid upto 31-12-2014)
Licence to Post without Pre-payment.
WPP No. 14/12-14
(Issued by CPMG UK. valid upto 31-12-2014)
RNI No. 66691/97
MH/MR-NW-56/2012-14
'D' No. MR/TECH/47.3/2013




जागेअभावी आम्ही सर्वच छायाचित्रे देऊ शकलो नाहीत. अन्य अनेक छायाचित्रांसाठी पहा : www.ashram.org

## 'A2Z' व 'सुदर्शन' सारख्या संस्कृतिनिष्ठ विरळ्या चॅनल्स्नी पूज्य बापूजींचे करोडो शिष्य व जागृत जनतेचा आवाज समाजापर्यंत पोहोचविला, परंतु अन्य अनेक चॅनल्स् मूग गिळून बसले, असे का ?




Posting at Dehradun G.P.O. between 1st to 17th of every month. * Posting at MBI Patrika Channel on 9th & 10th of E.M.